• पंढरपूर • गुरुवार, ९ जानेवारी २०२५
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000 • वर्ष २९ • अंक - २२९



माढ्याचे आ. अभिजीत पाटील यांनी केली परिसराची पाहणी
PII



ऊस बिल शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा - चेअरमन संजय आवताडे
PIII

## » At a Glance

### तुरीची पोती आणायला जाताना अपघाती मृत्यू




**मंगळवेढा :** तुरीची रास सुरु असताना तूर भरण्यासाठी दुचाकीवरून पोती आणायला गेलेल्या अशोक आमगोंडा बिराजदार (वय ५०) यांचा मरवडे ते मंगळवेढा रोडवरील तळसंगी फाट्याजवळ अपघात झाला. त्यांच्या दुचाकीला कारने (एमएच १०, डीटी ५५८१) जोरात धडक दिली. त्यात गंभीर जखमी अशोक बिराजदार यांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी मृताचा पुतण्या अमोल बिराजदार यांनी मंगळवेढा पोलिसांत फिर्याद दिली.

### सहसंचालकांची २३ साखर कारखान्यांना नोटीस




**सोलापूर :** जिल्ह्यातील ३१ साखर कारखान्यांची धुराडी पेटली असली तरी ऊस उत्पादकांचे पैसे देण्याची साखर कारखानदारांची मानसिकता दिसत नाही. साखर हंगाम सुरू होऊन ५० दिवसांचा कालावधीत लोटला तरी कारखानदारांनी शेतकऱ्यांचे पैसे देण्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे रयत क्रांती शेतकरी संघटनेने याची तक्रार केली होती. त्यानंतर प्रादेशिक साखर कार्यालयाने जिल्ह्यातील २३ साखर कारखान्यांना नोटीस बजावली आहे.

### ... तोपर्यंत सत्कार स्वीकारणार नाही



**सोलापूर :** फलटण - पंढरपूर रेल्वे मार्ग पूर्ण झाल्याशिवाय व निरा - देवधरचे पाणी सांगोल्यापर्यंत गेल्याशिवाय मी कोणत्याही स्वरूपाचा सत्कार स्वीकारणार नसल्याचे या अगोदरच जाहीर केले आहे. मी यासाठी अध्यापही सत्कार स्वीकारत नाही. फलटण विधानसभेची जागा जिंकल्यानंतर यापुढे सोलापूर जिल्हा व विशेषतः माढा मतदारसंघावर भाजप वाढीसाठी विशेष लक्ष देणार असल्याचे माढ्याचे खासदार माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी सांगितले.

### विना परवाना शस्त्र बाळगल्याप्रकरणी एकास



**मोहोळ :** समाज माध्यमावर व्हिडिओद्वारे हातात पिस्टल घेऊन पिस्टल लोड असल्याचे सांगत लोकांना पिस्टल दाखवत दहशत पसरवून पिस्टलमधून हवेत फायर केल्याप्रकरणी प्रशांत तुकाराम भोसले (रा. खवणी) यांच्यावर विनापरवाना शस्त्र बाळगल्याप्रकरणी पोलिस हवालदार गोपाळ बजरंग साखरे यांनी गुन्हा दाखल केला आहे. पोखरापूर येथे मोहोळ पोलिसांच्या पथकाने सापळा लावून यांना ताब्यात घेऊन अटक केली आहे. प्रशांत भोसले याला येथील न्यायालयात हजर केले असता, दोन दिवसांची पोलिस कोठडी मिळाली आहे. प्रशांत भोसले यास अटक करण्यात आली असून पोलीस त्याची कसून चौकशी करीत आहेत. त्याच्याकडून अनेक गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

# जेपीसीची पहिली बैठक

## एक देश एक निवडणूक: प्रियांका गांधी यांनी केली खर्चाची विचारणा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** देशभरातील लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या दोन विधेयकांवर विचार करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त संसदीय समितीची (जेपीसी) बुधवारी पहिली बैठक झाली. यावेळी काँग्रेसच्या सरचिटणीस आणि वायनाडच्या खासदार प्रियांका गांधी वाड्रा यांनी ईव्हीएमपासून निवडणूक खर्चापर्यंत प्रश्न विचारले आणि एक देश, एक निवडणुकीच्या व्यवहार्यतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

प्रियांका गांधी यांनी संयुक्त संसदीय समितीला लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेणे आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरेल का आणि तसे असेल तर या देशव्यापी महाअभियानावर किती खर्च केला जाईल, अशी विचारणा केली. देशभरात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेण्यासाठी किती इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनची (ईव्हीएम) आवश्यकता असेल, असा प्रश्नही त्यांनी केला.

अन्य एका काँग्रेस खासदाराने म्हटले की, एक देश, एक निवडणूक हे संविधानाच्या मूलभूत संरचनेचे उल्लंघन आहे, जे १९७३ च्या केशवानंद भारती प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवले होते. या ऐतिहासिक निकालात सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला होता की, संसदेला घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार आहे, परंतु ती लोकशाही, धर्मनिरपेक्षता, संघराज्य आणि कायद्याचे राज्य ही मूलभूत वैशिष्ट्ये बदलू शकत नाही.

हिवाळी अधिवेशनात संविधान (१२९ वी दुरुस्ती) विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक नुकतेच लोकसभेत मांडण्यात आले आणि ते समितीकडे पाठविण्यात आले. एकाच वेळी निवडणुका घेण्याच्या दोन मसुद्यांवर विचार करण्यासाठी अधिक राजकीय पक्ष या प्रक्रियेत सहभागी होण्यास इच्छुक असल्याने सरकारने समितीचे संख्याबळ ३१ वरून ३९ करण्याचा निर्णय घेतला.

माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर, पुरुषोत्तम रूपाला, मनीष तिवारी यांच्यासह अनिल बलूनी, बांसुरी स्वराज आणि संबित पात्रा यांच्यासह अनेक खासदार या समितीचे सदस्य आहेत. या समितीत लोकसभेचे २७ आणि राज्यसभेचे १२ सदस्य आहेत.

खा. पीपी चौधरी यांच्या अध्यक्षतेखालील ३९ सदस्यीय संयुक्त संसदीय समितीमध्ये काँग्रेसच्या प्रियांका गांधी, जनता दल (युनायटेड)चे संजय झा, शिवसेनेचे श्रीकांत शिंदे, आम आदमी पक्षाचे (आप) संजय सिंह आणि संजय सिंहांचा समावेश आहे. तृणमूल काँग्रेसच्या कल्याण बॅनर्जी यांच्यासह सर्व प्रमुख पक्षांच्या सदस्यांचा यात समावेश आहे.

### १८ हजार पानांचा अहवाल

आज जेपीसीची बैठक सुरू होताच कायदा व न्याय मंत्रालयाच्या अधिकाऱ्याने समितीच्या सदस्यांना प्रस्तावित कायद्यातील तरतुदींची माहिती दिली. यासोबतच समितीच्या सर्व सदस्यांना १८ हजार पानांचा अहवाल एका सुटकेसमध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे. सभेतून बाहेर पडताना सर्व खासदार एक मोठी सुटकेस ट्रॉली आणि एक छोटी बॅग घेऊन जाताना दिसले, ज्यामध्ये हा अहवाल ठेवण्यात आला होता.

### मतदारांचा कौल बाजूने

एका सर्वेक्षणात, ७० टक्क्यांहून अधिक मतदारांनी एक देश एक निवडणूकच्या बाजूने मतदान केले. एकाचवेळी निवडणुका घेण्यात आल्याने, राष्ट्रीय तसेच प्रादेशिक समस्यांचे निराकरण करण्यास मदत होईल. त्यामुळे चांगले धोरणात्मक निर्णय घेणे शक्य होईल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. यात २९ राज्ये तसेच केंद्रशासित प्रदेशांमधील ४,५७३ व्यक्तींचे म्हणणे जाणून घेण्यात आले.

## रब्बी पीक कर्ज वाटपात बँकांचा हात आखडता; शेतकऱ्यांतून तीव्र संताप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** शेतकरी आर्थिक संकटात असल्यामुळे शासनाने राज्यातील राष्ट्रीयकृत व जिल्हा बँकांना सोलापूर जिल्ह्यातील 20 लाख शेतकऱ्यांना रब्बी हंगामात पीक कर्जापोटी 21 हजार 251 कोटी रुपयाचे वाटप करण्यात यावे असे आदेश दिले होते. मात्र बँकांनी 7 लाख 19 हजार शेतकऱ्यांना 12 हजार 172 कोटी रुपयाचे वाटप केले आहे. अद्याप 12 लाख शेतकरी पीक कर्जापासून वंचित असल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. यंदा जून महिन्यापासून चांगला पाऊस पडला असल्यामुळे नदी, नाले, ओढे, तलाव,विहिरी,शेततळी यामध्ये पाणी साठले आहे. तसेच जमिनीतील पाण्याची पातळी वाढली आहे. त्यामुळे यंदाचा रब्बी हंगाम चांगल्या प्रकारे पार पडणार असल्याने आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना सोलापूर जिल्ह्यातील 20 लाख शेतकऱ्यांना बँकांनी 21 हजार 251 कोटी रुपयाचे कर्ज वाटपाचे उद्दिष्ट दिले होते. मात्र बँकांनी सात लाख 19 हजार शेतकऱ्यांना 12 हजार 172 कोटी रुपयाचे वाटप केले आहे. अद्यापही 12 लाख शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहिले आहेत. गेल्या वर्षी म्हणावा तसा पाऊस पडला नसल्यामुळे शेतकऱ्यांनी खरीप व रब्बी हंगामात म्हणावी तशी पिकांची लागवड केली नव्हती. मात्र यंदा जून महिन्यापासून चांगला पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांनी खरीप व रब्बी हंगामातील पिकांची पेरणी केली आहे. मात्र

» पान ३ वर



### सांगोल्यासह 'या' गावात येणार पाणलोट यात्रा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** प्रत्येक गावात सामूहिक श्रमदानातून पाणलोट चळवळ निर्माण व्हावी या उद्देशातून केंद्र सरकारने राज्यातील ३० जिल्ह्यात पाणलोट यात्रा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. सोलापूर जिल्ह्यातील कुडूवाडी, माढा, मंगळवेढा तसेच सांगोला या चार तालुक्यात लवकरच पाणलोट यात्रा सुरू होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. या यात्रेच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली.

## पंढरपूर तालुक्यातील चार गावात अद्याप स्मशानभूमी नाही

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** ग्रामीण भागात नागरिकांना सोयी सुविधा मिळाव्यात म्हणून केंद्र व राज्य शासन कोट्यावधी रुपयाचा निधी देत आहे. मात्र सोलापूर जिल्ह्यात 58 गावात अद्याप स्मशानभूमी नाही. यात पंढरपूर तालुक्यातील 4 गावांचा समावेश आहे. गावात स्मशानभूमी नसल्यामुळे ग्रामस्थांना एखादी व्यक्ती मयत झाल्यास शेजारील गावातील स्मशानभूमीत अंत्यविधी करावा लागत आहे. यामुळे गैरसोय होत आहे. प्रत्येक गावातील नागरिकांना सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी केंद्र व राज्य शासनाने लक्ष केंद्रित केले आहे. ग्रामपंचायतचा कारभार चांगल्या प्रकारे चालावा यासाठी ग्रामपंचायत निधी दिला जात आहे. तर काही ग्रामपंचायतीमध्ये संगणकाचा वापर करून कामकाज सुरू करण्यात आले आहे. गावातील नागरिकांना वीज, रस्ते, पाणी, आरोग्य या सुविधा मिळाव्यात यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. यासाठी केंद्र व राज्य शासन कोट्यावधी रुपयाचा निधी देत आहे. ग्रामीण भागाच्या विकासाकडे लक्ष केंद्रित करण्यात आले असले तरी भारताला स्वातंत्र्य मिळून 78 वर्ष झाले तरी अद्याप सोलापूर जिल्ह्यातील 58 गावात अद्याप स्मशानभूमी नाही. यात पंढरपूर तालुक्यातील चार गावांचा समावेश आहे. यात तारापूर, अजनसोंड या गावाचा समावेश आहे. एखादी व्यक्ती गावात मयत झाल्यास शेजारील गावात असलेल्या स्मशानभूमीत जाऊन अंत्यविधी करावा लागत आहे. यामुळे गैरसोय निर्माण होत आहे. तरी राजकीय नेत्यांनी लक्ष घालून जिल्ह्यातील 58 गावांमध्ये स्मशानभूमीची सोय करून द्यावी अशी मागणी होत आहे.

## आठ हजाराची लाच स्विकारताना पोलीस हवालदार ए.सी.बी.च्या जाळ्यात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** भावकीतील भांडणातील गुन्ह्यात सहकार्य करण्यासाठी व तक्रारदार याच्या पत्नीस अटक न करण्यासाठी आठ हजाराची लाच स्वीकारताना पोलीस हवालदार दत्तात्रय बळीराम थोरात यास ए.सी.बी.ने रंगेहात पकडले .

याबाबत मिळालेली माहिती अशी कि दोन भावामध्ये भांडणे झाली होती यामध्ये दोघांनी एकमेका विरोधात माळशिरस पोलिसात तक्रार दाखल केली होती. .तक्रारदार व त्याचे भाऊ यांना सदर गुन्ह्यात अटके नंतर न्यायालयातून जमीन मिळाला होता .तक्रारदार यांच्या पत्नीस अटक न करण्यासाठी व दोषारोप पत्रात मदत करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडून तपास हवालदार थोरात यांनी दहा हजार रुपयांची मागणी केली तडजोडी नंतर ८ हजार तडजोड झाली.याबाबत तक्रारदार यांनी लाच लुचपत प्रतिबंधकव विभाग यांच्याशी संपर्क साधला.पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे व डॉ शितल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपाधीक्षक गणेश कुंभार ,गणेश पिंगुवाले ,पोलीस अंमलदार सायबन्ना कोळी ,संतोष नरोटे ,गजानन किणगी,चालक राहुल गायकवाड यांच्या पथकाने सापळा रचून थोरात यांना ८ हजाराची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

## तरुणावर काळाचा घाला, २ जखमी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**करमाळा :** जागरण गोंधळाचा कार्यक्रम करून परत येताना झालेल्या अपघातात पांडे येथील युवक जागीच ठार झाला. तर दोन जण जखमी झाले. ही घटना आज (दि. ७) सकाळी घडली. विशाल राघव कोल्हे (वय २३) असे मृत तरुणाचे नाव आहे. गणेश नेतेकर (वय २०) व सिद्धार्थ विकास भोसले (वय १९) असे जखमी तरुणांची नावे आहेत. जखमी गणेश नेतेकर व सिद्धार्थ विकास भोसले यांच्यावर करमाळा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. याबाबत अपघात झाल्यानंतर अज्ञात वाहन व त्याचा चालक या ठिकाणावरुन फरार झाला आहे. पोलीस या अज्ञात वाहनाचा शोध घेत असल्याचे सांगण्यात आले.

## वाचकांसाठी सुवर्णसंधी !!!

सादर करीत आहे एक आकर्षक योजना ३९९ रु. मध्ये सहा महिने घरपोच अंक

‘ दै.पंढरी संचार ’

काही कारणास्तव सदर स्कीम स्थगित करण्यात येत आहे. लवकरच या स्कीम संदर्भात कळविण्यात येईल.

संपादक

## तिकीट संग्राहक डॉ.श्रीधर यलमार यांच्याकडील

## श्रीराम मंदिराच्या पोस्ट तिकीटाचे विठ्ठल मंदिरात अनावरण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** भारत सरकारच्या वतीने पोस्ट विभागाच्या माध्यमातून अखंड हिंदू समाजाचे दैवत असणाऱ्या प्रभू रामचंद्राच्या अयोध्या येथील नवीन मंदिराचे पोस्टाचे तिकीट प्रकाशित करण्यात आले असून सदर तिकीट देशभरातील तिकीट संग्रह करणाऱ्या व्यक्तींना पाठवण्यात आले असून सदर तिकीट भंडीशेगाव येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक राहिलेले डॉ. श्रीधर येलमार यांच्याकडे आले असून या पोस्ट तिकिटाचे प्रथम अनावरण श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे करण्यात आले.यावेळी मंदिर समितीतील प्रशासकीय अधिकारी मनोज शोत्री उपस्थित होते.



देश स्वतंत्र्यानंतर भारत सरकारच्या वतीने वेगवेगळ्या क्रांतिकारकांची आणि राष्ट्रीय महापुरुषांच्या तिकिटाचे प्रकाशन वेळो वेळी केले. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या दिवसाचे निमित्त साधून क्रीडा विषयक,बालक विषयक,निवडणूक-पक्षी-प्राणी आणि हजारो विषयावर वेगवेगळ्या प्रकारचे तिकीट भारत सरकारच्या पोस्ट विभागाच्या माध्यमातून प्रकाशित केलेली आहेत.

यावेळी भारत सरकारच्या माध्यमातून अतिशय सुंदर असे श्री. प्रभू रामचंद्राचे पोस्टाचे तिकीट आणि त्याला अतिशय सुबक अशी फ्रेम बनवून सदर तिकीट पोस्टाच्या माध्यमातून देशभरात पाठवण्याचा संकल्प केंद्र सरकारच्या वतीने करण्यात आलेला आहे.अशाच प्रकारचे तिकीट भारत सरकारच्या पोस्ट विभागाच्या वतीने देशभरातील फिलाटेलिया सदस्यांना सर्वात प्रथम ही तिकिटे पाठवण्यात आली.अशा प्रकारचे तिकीट पंढरपूर तालुक्यातील भंडीशेगाव येथील तिकीट संग्रहकडॉ.श्रीधर यलमार यांच्याकडे आल्यानंतर सदर तिकिटाचे प्रथम प्रकाशन श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये करण्याचे नियोजन करण्यात आले,यावेळी गिरीश काका आराध्ये प्रल्हाद होटे उपस्थित होते. लवकरच या पोस्ट तिकीटाचे पंढरपूर तालुक्यात मोठ्या थाटामाटात प्रकाशन करण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती तिकिट संग्रहक डॉ. श्रीधर येलमार यांनी यावेळी दिली.

**सोलापूर :** तीन जमीन मालकांची जमीन ताब्यात घेऊन कायद्यात नमूद केलेल्या मुदतीत त्या संपादित केल्याची कोणतीही औपचारिक अधिसूचना न काढल्याने उच्च न्यायालयाने महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण व सोलापूर महानगरपालिकेला दंड ठोठावला आहे. या प्रकरणी तिन्ही जमीन मालकांना प्रत्येकी 50 हजार रुपये नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. राज्य सरकारने अधिसूचना न काढल्याने आपली जमीन आपल्या ताब्यात द्यावी अशी मागणी तिन्ही जमीन मालकांनी उच्च न्यायालयात केली होती.

### उजनी धरणावर पर्यटन स्थळ होण्यासाठी हालचाली सुरू

# माढ्याचे आ. अभिजीत पाटील यांनी केली परिसराची पाहणी

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**माढा :** पंढरपूर विधानसभा मतदार संघाचे धडाडीचे आमदार अभिजीत पाटील यांनी आपल्या मतदार संघाचे व्हिजन समोर ठेवत विकास झपाट्याने व्हावा. यासाठी आमदारपदी निवडून आल्यापासून प्रयत्न चालविले आहेत. त्यातीलच एक महत्वाच्या म्हणजेच उजनी धरणाच्या पर्यटन स्थळ विकासासाठी हिवाळी अधिवेशनवेळी प्रश्न मांडला होता. त्याची अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यावेळी उजनी धरणावरील पाणी सोडण्याचे नियोजन जाणून घेत धरणाची पाहणी केली. सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी ठरलेल्या उजनी धरणावर पर्यटन स्थळ व्हावे. त्यामुळे मोठे अर्थकारण या भागासाठी उपल्ब्ध होईल. यासाठी माढा विधानसभेचे आमदार अभिजीत पाटील यांनी नागपूर अधिवेशनामध्ये उजनी धरणावर पर्यटन स्थळ व्हावे. म्हणूनच आवाज उठवला असता, त्यावर तातडीने उजनी धरण भिमानगर येथे उजनी धरणाचे अधिकारी व आ. अभिजीत पाटील व आ. नारायण आबा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक पार पडली.

त्यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी उजनी धरणाचीही आवर्जून पाहणी केली आहे. यावेळी जिल्हा परिषदेचे सदस्य भारत शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे संजय कोकाटे, भारत पाटील, नितीन कापसे, सरपंच प्रमोद कुटे, डीव्हीपी बँकेचे चेअरमन औदुंबर महाडिक, नाना महाडिक, सौदागर जाधव, यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, अधिकारी उपस्थित होते.

## जनावरे कत्तलीकडे घेऊन जात असताना कारवाई




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** बेकायदेशीररीत्या जर्सी गाई कत्तल करण्याच्या उद्देशाने एका टेम्पोत घेऊन जात असताना मोहोळ पोलिसांच्या पथकाने धाड टाकली. या कारवाईत १३ जर्सी गाईंसह टेम्पो असा एकूण ७ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सध्या सर्वात्र दुभती जनावरे कत्तलीसाठी विक्री केली जात असल्याचे दिसून येत आहे. पोलिसांच्या सतर्कतेमुळे या जनावरांची सुटका झाली आहे. या प्रकरणी वाहेद शब्बीर कुरेशी (रा. अकलूज, ता. माळशिरस) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. याबाबत पोलिस कॉन्स्टेबल धनाजी केशव घोरपडे यांनी फिर्याद दिली आहे. अधिक तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल उपासे करीत आहेत.

## » Selected

## बेकायदा वृक्षतोड करणे भोवले

**सोलापूर :** सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील झाड विना परवाना तोडल्यामुळे एका झाडामागे पाच हजारांचा दंड आकारला जातो. गेल्या वर्षभरात साडेचार लाख रुपयांची दंडात्मक कारवाई झाल्याचे उद्यान विभागाकडून सांगण्यात आले. उद्यान विभागाचे अधीक्षक किरण जगदाळे यांनी सांगितले की बेकायदेशीरपणे वृक्षतोड झाल्यास एका झाडामागे पाच हजार रुपयांचा दंड केला जातो. सात जणांवर ही कारवाई झाली असून जिल्हा दुग्ध संघाच्या व्यवस्थापनावर सर्वात मोठी कारवाई झाली आहे. केगाव येथील जागेत वृक्षतोड झाली होती. या प्रकरणात चार लाख रुपयांचा दंड झाला आहे.

## शासकीय मैदानावर भाजपचे सदस्यता नोंदणी अभियान



**सोलापूर :** भारतीय जनता पक्षाच्या सदस्यता नोंदणी अभियानाला राज्यभरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, याच अनुषंगाने सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुभाष देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत शासकीय मैदान जुळे, सोलापूर येथे सदस्य नोंदणी अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित नागरिक, युवक आणि ज्येष्ठांनी मोठ्या संख्येने भारतीय जनता पक्षाचा सदस्य म्हणून नोंदणी केली. यावेळी आ. देशमुख यांनी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवण्यासाठी हे अभियान यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सूचना केल्या.

## सोलापूर महापालिकेच्यावतीने पोषण पुनर्वसन केंद्राची स्थापना



**सोलापूर :** सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक शीतल तेली-उगले यांच्या हस्ते सोलापूर महानगरपालिकेच्या पोषण पुनर्वसन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी आयुक्त शीतल तेली-उगले यांनी पोषण पुनर्वसन केंद्रावर दाखल कुपोषित बालक व त्यांच्या माता यांच्याशी संवाद साधून बाळाच्या काळजीबाबत मार्गदर्शन केले. यावेळी बालरोगतज्ज्ञ डॉ. कोरे, डॉ. चाफळकर, डॉ. वाळवेकर, डॉ. आतिश बोराडे तसेच शहरांमधील राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचे वैद्यकीय अधिकारी, अंगणवाडी सेविका, आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी आदी उपस्थित होते.

## कुत्रा चावल्याचा राग; तिघांना १० जणांनी केली मारहाण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** माझ्या आईस तुझा कुत्रा चावल्याचा राग मनात धरून १० जणांनी तिघांना मारहाण केली. ही घटना सोमवारी तुगंत येथे घडली. पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीप्रमाणे, अभिजित तानाजी रणदिवे (वय २१), शुभम तानाजी रणदिवे, संगीता तानाजी रणदिवे (सर्व रा. तुंगत, ता. पंढरपूर) हे सोमवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास घरी होते. यावेळी आईस तुझा कुत्रा चावला आहे, याचा राग मनात धरून दहा जणांनी हाताने, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच शिवीगाळी, दमदाटी करीत लाकडी दांडके, पाईपने हातावर, पायावर, डोक्यावर पाठीवर मारून जखमी केले.

## शेतशिवारातील अवैध हातभट्टी दारूवर पोलिसांची कारवाई



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील शेटफळमध्ये मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या हातभट्टी विक्री सुरू होती. याबाबत पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांच्या पथकाने कारवाई करत तब्बल 2200 लिटर दारू साठा व रसायने जप्त केले आहेत. साधारणपणे एक लाख हुन अधिक किमतीची कारवाई झाल्याने अवैध धंदे चालकांचे धाबे दणाणले आहेत. याबाबत तालुका पोलिसांनी कारवाईचा मोठा सपाटा तालुक्यात सुरू केलेला दिसून येतो.

## निवेदन...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**मोहोळ :** मोहोळ नगर परिषदेकडून करण्यात आलेल्या करवाढीला स्थगिती द्यावी. अशी मागणी मोहोळचे प्रथम नगराध्यक्ष रमेश बारस्कर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदन द्वारे करण्यात आली आहे.

# मोहोळ नगरपरिषदेच्या करवाढीस स्थिगिती मिळावी - रमेश बारसकर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** मोहोळ नगर परिषदेकडून करण्यात आलेल्या करवाढीला स्थगिती द्यावी. अशी मागणी मोहोळचे प्रथम नगराध्यक्ष रमेश बारस्कर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदन द्वारे करण्यात आली आहे.

मोहोळ नगर परिषदेत 2022-2023 ते 2025-2026 या कालावधीत घरपट्टी, पाणीपट्टी, गाळे भाडेवाढ, कमर्शियल कर आणि इतर करांची भरमसाठ वाढ करण्यात आली आहे. यामुळे मोहोळ शहरातील सर्वसामान्य नागरिकांवर कराचा जास्तीचा बोजा पडत आहे. याबाबत मोहोळचे पहिले नगराध्यक्ष रमेश बारसकर यांनी सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी या करवाढीला तात्काळ स्थगिती मिळावी, अशी मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे. या संदर्भात, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकारात्मक प्रतिक्रिया देत या बाबतीत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. यापुर्वी मोहोळचे आमदार राजू खरे यांनीही करवाढीला स्थगिती मिळवण्यासाठी मागणी केली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख चरणराज चवरे तसेच नगराध्यक्ष रमेश बारसकर यांनी देखील या मागणीला समर्थन दिले आहे. मोहोळ तालुक्यातील पेनूर (ता.मोहोळ) येथील सोलापूर नियोजन समितीचे सदस्य व शिवसेना जिल्हाप्रमुख चरणराज चवरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन मोहोळ तालुक्याच्या विविध प्रश्नांवर चर्चा केली.

चरणराज चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली, डीपीडिसी आणि मुख्यमंत्री निधीतून मोहोळ तालुक्याला कोट्यवधी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांनी मोहोळ तालुक्याच्या विकासासाठी अनेक महत्त्वाची कामे सुरू केली आहेत.

आ. राजू खरे हे सध्या विकास कामासंदर्भात आक्रमक झाले आहेत. त्यांनी मोहोळ शहराचा विकास करण्याचा निर्धार केला आहे.

## अंमली पदार्थाची तस्करी होऊ नये यासाठी दक्ष राहा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** सोलापूर जिल्ह्यात अंमली पदार्थाचे उत्पादन व विक्री होणार नाही या दृष्टीने अन्न व औषध प्रशासन विभागाने अत्यंत तत्पर राहावे. रासायनिक व साखर कारखाने, सर्व मेडिकल स्टोअर्स यांच्यावर ही नियंत्रण ठेवावे. तसेच वेळोवेळी तपासणी मोहीम राबवावी. जिल्ह्यात कोणत्याही प्रकारे अंमली पदार्थाची तस्करी होणार नाही या दृष्टीने सर्व संबंधित विभागानी आपापल्या स्तरावरून योग्य दक्षता घ्यावी, असे आवाहन अतिरिक्त पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर यांनी केले.

## विकासकार्याला गती देण्यासाठी कटिबद्ध



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** विधानसभा निवडणुकीत मतदारांनी दाखवलेल्या विश्वासाच्या जोरावर मिळालेल्या अभूतपूर्व यशानंतर जनतेचे आभार मानण्यासाठी सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे भाजपाचे आमदार सुभाष देशमुख यांनी मनगोळी येथे सदिच्छा भेट दिली. या भेटीच्या निमित्ताने त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या पाठिंब्याबद्दल आभार व्यक्त केले. आगामी काळात त्यांच्या विश्वासाला पात्र ठरवण्यासाठी आणि विकासाच्या कार्याला गती देण्यासाठी कटिबद्ध राहण्याचे आश्वासन दिले. यावेळी अप्पासाहेब मोटे, संजय गायकवाड, अभिजित कापसे आदी उपस्थित होते.

## अजितदादांकडे केली 'ही' मागणी



**सोलापूर :** सोलापूर महानगरपालिकेतील रोजंदारी बदली कामगारांना सेवेत कायम करणे संदर्भात उप मुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी मुंबई येथे भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी अजित पवार यांनी बदली रोजंदारी कामगारांना कायम करण्यासंदर्भात लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेऊ अशी ग्वाही दिली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड भागाचे आमदार अण्णा बनसोडे, आमदार शिवाजीराव गर्जे, सोलापूर महानगरपालिका माजी नगरसेवक गणेश पुजारी, अविनाश भडकुंबे आदी उपस्थित होते.




### सांगोला तालुक्यातील तलाठी यांचे

# बेमुदत कामबंद आंदोलन सुरु ; नागरिकांची गैरसोय

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**सांगोला :** सांगोला तालुक्यातील सर्व तलाठ्यांनी आज 06 जानेवारी 2025 पासुन बेमुदत कामबंद आंदोलन सुरु केले आहे. सोलापूर जिल्हा तलाठी संघ सोलापूर यांनी जिल्हाधिकारी यांना दि.18/12/2024 रोजी दिलेले निवेदनानुसार विविध मागण्यासाठी काम बंद आंदोलन सुरु केले असल्याचे तालुकाध्यक्ष हरिश्चंद्र जाधव व सचिव विशाल जगाते यांनी सांगितले .

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ अतिकालिक भत्ता मिळणेबाबत. 2) लॅपटॉप व स्कॅनरसह प्रिंटर्स मिळणेबाबत. 3) साझा पुनर्रचनेनुसार साझा फोड करणेबाबत. 4) ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांची सेवाजेष्ठता यादी प्रसिद्ध करणेबाबत. या अत्यावश्यक चार मागण्या संदर्भात निवेदन दिलेले होते. व सदर मागण्या पुढील १५ दिवसात पूर्ण कराव्यात असे सदर निवेदनामध्ये नमूद केले होते. परंतु सदर मागण्या संदर्भात जिल्हा प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे सभासदांमध्ये प्रचंड नाराजी आहे. त्यामुळे 08/12/2024 च्या जिल्हासंघाच्या बैठकीत सर्वानुमते ठरल्याप्रमाणे जिल्हातील सर्व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) व तलाठी संवर्गातील मंडळ अधिकारी दि.06/01/2025 पासून बेमुदत कामबंद आंदोलन करीत आहे.

सांगोला तालुका तलाठी संघटना यामध्ये सहभागी झाली असल्याचे निवेदन तहसीलदार संतोष कणसे यांना तालुकाध्यक्ष हरिश्चंद्र जाधव, सचिव विशाल जगाते व तलाठी बंधू-भगिनींनी दिले.

पंढरी संचार

**माढा :** मोडनिंब येथे ऊस वाहतूक करणारा रिकामा ट्रॅक्टर पलटी होऊन ट्रॅक्टरचालकाचा जागीच मृत्यू झाला आहे. पोपट गायकवाड (४८, रा. पेहे, ता. पंढरपूर) असे मरण पावलेल्या ट्रॅक्टरचालकाचे नाव आहे. अधिक माहिती अशी की, म्हैसगाव येथील ओंकार शुगर फॅक्टरी येथून ऊसखाली करून ट्रॅक्टर (क्र. एमएच १३ के ५५७९) घेऊन पेहेकडे घेऊन जात होते. सोलापूर-पुणे महामार्गावर मोडनिंब गावाजवळ पेट्रोलपंपासमोर ट्रॅक्टरचालकाचे नियंत्रण सुटल्याने टॅक्टर पलटी झाली. तेव्हा ट्रॉलीचे चाक डोक्यावरून गेल्यामुळे चालकाचा जागीच मृत्यू झाला.

## आवताडे शुगर कडून २८०० रुपये प्रति टन याप्रमाणे
# ऊस बिल शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा - चेअरमन संजय आवताडे

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**मंगळवेढा :** पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या आवताडे शुगर अँड डिस्टीलरीज प्रा. लि. नंदुर. या साखर कारखान्याचे गळीत हंगाम २०२४-२५ मधील ३० नोव्हेंबर पर्यंतचे उसाचे बिल २८०० रुपये प्रति टन याप्रमाणे शेतकरी-ऊस उत्पादकांच्या खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे यांनी माध्यमांना दिली . यावेळी मंगळवेढा मार्केट कमिटीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, कार्यकारी संचालक मोहन पिसे, भारत निकम, सरव्यवस्थापक (टेक्नी) सुहास शिनगारे, मोहन पवार, संभाजी फाळके, बजीरंग जाधव, शेती अधिकारी राहुल नागणे, तोहीद शेख, दामोदर रेवे उपस्थितीत होते.

यावेळी बोलताना चेअरमन संजय आवताडे म्हणाले की २ वर्षापूर्वी आमदार समाधान दादा आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली फॅबटेक समूहातून हा कारखाना खरेदी करून आवताडे उद्योग समुहाने घेतल्यानंतर कारखान्याचा हा तिसरा हंगाम सुरू असून कारखान्याची वाटचाल व्यवस्थित सुरू आहे. आम्ही हा कारखाना केवळ शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतला असून या कारखान्यामधून आम्ही कोणताही स्वार्थ ठेवला नाही, आतापर्यंतच्या गळीत हंगामामध्ये कारखान्याचे सर्व कर्मचारी, ऊस वाहतूकदार, ऊसतोड मजूर व कारखाना प्रशासनाने मन लावून व प्रामाणिक काम केल्यामुळे आम्ही मागील दोन्हीही गळीत हंगाम यशस्वीरित्या पार पाडले. यावेळीही असेच सहकार्य सर्व कर्मचारी, ऊस पुरवठादार, ऊस उत्पादक हे करत असून आजअखेर 2 लाख मेट्रिक टन गाळप केले आहे. गळीत हंगाम यशस्वीरित्या पार पाडून शेतकऱ्यांचे समाधान होईल असा कारभार करून शेतकऱ्यांच्या विश्वासाला पात्र राहण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू तरी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आमच्यावर विश्वास ठेवून आपला ऊस आवताडे शुगरला घालून सहकार्य करावे असे आवाहनही चेअरमन संजय आवताडे यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

**खालील शाखेत उसबिले जमा**

बबनराव आवताडे पतसंस्था - शाखा मंगळवेढा मंगळवेढा, कचरेवाडी, घरनिक्की, धर्मगाव, खडकी, मल्लेवाडी, खोमनाळ, चिख्खलगी, शिरनांदगी, तावशी, ओझेवाडी, सरकोली, आंबे, रांजणी, चिचुंबे, सिद्धेवाडी, शिरगाव, एकलासपूर, ढवळस, लक्ष्मी दहिवडी, मुढवी, मारापुर,

बबनराव आवताडे पतसंस्था - शाखा मरवडे मरवडे, येड्राव, निंबोणी, हुलजंती, माळेवाडी, तळसंगी, भाळवणी (मंगळवेढा), डोणज, नंदुर, बनतांडा, कागष्ट, कत्राळ-कर्जाळ.

बबनराव आवताडे पतसंस्था - शाखा माचणुर माचणुर, ब्रम्हपुरी, मुंडेवाडी, रहाटेवाडी, तांमदर्डी, अर्धनारी, सोहाळे, कोथाळे, इचगाव, येणकी, मिरी, अरबळी, वटवटे, वडदेगाव, नळी, आंबेचिंचोली, बेगमपूर, पुळुज, पुळुजवाडी, औंढी, पाटकुल, टाकळी सिकंदर, खरसोळी, तारापूर.

यशोदा पतसंस्था- शाखा मंगळवेढा अकोले (भि), शेलेवाडी, गणेशवाडी, शरदनगर, ढेकळेवाडी, नंदेश्वर, भोसे, बठाण, गुंजेगाव, उचेठाण, महमदाबाद (शे)

लक्ष्मी पतसंस्था-शाखा आरळी अरळी, बोराळे, तेलगाव भीमा (दक्षिण), दसुर (कर्नाटक), सिद्धापूर, तांडोर

भैरवनाथ पतसंस्था – शाखा कंदलगाव भंडारकवठे, कुसूर, मंद्रूप भंडारकवटे, तेरामैल, वडापूर, बाळगी, निम्बर्गी, कंदलगाव, गुंजेगाव (द सो), अकोले (मंद्रूप) औराद, लवंगी (दक्षिण सोलापूर), मनगोळी, अंत्रोळी, माळकवठे, मंद्रूप, सादेपूर, कारकल, विंचूर, कुसुर, बरुर, टाकळी दक्षिण, नांदणी, राजुरी

सिद्धश्री पतसंस्था – कर्नाटका मधील सर्व उस पुरवठादार

## नेव्हीमध्ये नोकरी लावतो म्हणत ३५ लाखांचा गंडा




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** इंडियन व मर्चंट नेव्हीमध्ये नोकरी लावण्याचे आमिष दाखवून एकाने गावातील सात लोकांचा विश्वास संपादन करून प्रत्येकी ५ लाख ५० हजार रुपये घेऊन एकूण सुमारे ३५ लाख ६० हजार रुपये घेऊन मुलांना नोकरी न लावता फसवणूक केली. हा प्रकार २० ऑक्टोबर २०२१ ते १३ एप्रिल २०२४ यादरम्यान घेरडी (ता. सांगोला) गावात घडला. याबाबत प्रभाकर राजाराम पोळ यांनी फिर्याद दिली आहे. विष्णू लक्ष्मण गेजगे (रा. घेरडी, ता. सांगोला) याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. याबाबतचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

» पान १ वरुन

## रब्बी पीक कर्ज वाटपात बँकांचा हात...

बँकांकडून पीक कर्ज देण्यास आखडता हात असल्यामुळे लाखो शेतकऱ्यांना पीक कर्जापासून वंचित रहावे लागले आहे. प्रत्येक वर्षी शेतकरी शेतात पिकांची लागवड करण्यासाठी बँका पतसंस्था खाजगी सावकार यांच्याकडून कर्जाने रक्कम घेतो. मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतो. मात्र वसुलीचा तगादा लावला जातो. यामुळे शेतकरी टोकाचे पाऊल उचलतो. देशात आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढत असल्याने याची दखल घेऊन केंद्र सरकारने एक रुपयात पीक विमा योजना सुरू केली आहे. यामुळे शेतकऱ्यांनी शेतात पिकाची लागवड केल्यानंतर विमा उतरवल्यावर नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार आहे. या पीक योजनेस शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. मात्र बँका पीक कर्ज देण्यास आखडता हात घेत असल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. तरी राज्य शासनाने शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळावे यासाठी आढावा बैठक घ्याव्यात अशी मागणी होत आहे.

» Selected

## राऊत यांनीही घेतली मंत्री शिवेंद्रराजेंची भेट



**बार्शी :** राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी भेट घेतली. यावेळी मंत्रीपदाबद्दल त्यांचे अभिनंदन करत बार्शी तालुक्याच्या विविध विकास कामांबाबत चर्चा केल्याची माहिती त्यांनी दिली. विशेष म्हणजे आ. दिलीप सोपल हेही आज मंत्री शिवेंद्रसिंहराजे यांच्या भेटीला मंत्रालयात होते. म्हणजे बार्शीचे दोन्ही नेते एकाच दिवशी मंत्रालयात दिसले.

## बेंदवड्याचा प्रश्न मार्गी लावणार



**माढा :** भीमानगर येथे उजनी पर्यटन व पिंपळखुटे, अंबड कुर्डू बेंद ओढा संदर्भात जिल्हा नियोजन अधिकारी सिना-माढा योजनेचे कार्यकारी आभियंता मोरे यांच्याची चर्चा केली. बेंद ओढ्याचा विषय लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी ज्या काही उपाय योजना कराव्या लागतील व हे काम कसे पूर्ण होऊन अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला विषय मार्गी लावून पूर्ण करण्यात येईल यासाठी पूर्ण सहकार्य मी व आमदार अभिजित आबा पाटील करणार असे प्रतिपादन त्यांनी केले.

## ग्राम महसूल अधिकाऱ्यांचे कामबंद आंदोलन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** लोकसभा सार्वत्रिक निर्वडणूक-2024 अतिकालिक भत्ता मिळावा, लॅपटॉप व स्कॅनरसह प्रिंटर्स मिळावेत, साझा पुनर्रचनेनुसार साझा फोडण्यात यावा. ग्रामीण महसूल अधिकारी (तलाठी) यांची सेवाज्येष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात यावी. या अत्यावश्यक मागण्या संदर्भात निवेदन दिलेले होते. सदर मागण्या पुढील 15 दिवसांत पूर्ण कराव्यात, अशी मागणी केली होती. मात्र त्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे.

## गिनीज बुकात नोंद

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सोलापूर :** केरळ राज्यातील कोची येथे झालेल्या भरतनाट्यम्, मृदंग नादम विश्वविक्रम कार्यक्रमांमध्ये सोलापुरातील तीन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. नटराज नृत्य संगीत विद्यालयाच्या रितिका श्रीमल, प्रगती मोने, वर्षा मोने या तीन विद्यार्थ्यांनी त्यात सहभाग घेतला. त्यांच्या नृत्याची नोंद गिनीज विश्वविक्रमामध्ये करण्यात आली आहे. या विश्व विक्रमामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थिनींना गिनीज बुकच्या वतीने विश्वविक्रम केल्याबद्दल प्रशस्तिपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

## रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत रस्ता सुरक्षा रॅली संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अकलूज व पोलीस ठाणे अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने *"हेल्मेट, सीटबेल्ट , सुरक्षित विद्यार्थी वाहतूक* रॅलीचे आयोजन दिनांक 07/01/2025 रोजी करण्यात आले होते.

रस्त्यावर आपली स्वतःची व इतरांची काळजी सर्व वाहनचालकांनी घ्यावी , दुचाकी वर हेल्मेट व चार चाकी वाहनात सीटबेल्ट वापरावा शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक ही स्कूलबस सारख्या सुरक्षित वाहनाद्वारेच करण्यात यावी असा संदेश अकलूज शहरात या रॅली मार्फत देण्यात आला. नियम पाळा अपघात टाळा, येईल शाळा वाट द्या बाळा, रस्ते पे मस्ती जान नही सस्ती, करा पालन नियमांचे रक्षण होईल जीवाचे, इत्यादी घोषणा ध्वनीक्षेपकामार्फत देत या रॅलीने मार्गक्रमण केले.

या रॅलीमध्ये श्रीराम शिक्षण संस्था, पानीव, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ सराटी येथील स्कूल बस सहभागी झाल्या.

तसेच दुचाकी अधिकृत वितरक सोनाझ हिरो व नष्टे होंडा यांचेही सर्व दुचाकी चालक हेल्मेट सहभागी झाले होते. या रॅलीस अकलूज उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात कार्यरत ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक चालक, चालक-मालक यांच्या प्रतिनिधी संघटनेचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी सहकार्य केले. सदर रॅलीचे आयोजन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्री अमरसिंग गवारे, ARTO श्री संभाजी गावडे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले होते .रॅलीस प्रारंभ ARTO अश्विनकुमार पोंदकुले व API योगेश लंगुटे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून झाला. रॅलीस उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे मोटार वाहन निरीक्षक श्री पाटील , झाडबुके, राऊत, कुडपणे, पोमन , जगताप, शिंदे, सर्व वाहन चालक व स्टाफ तसेच पोलीस ठाणे अकलूजचे सपोनी गणेश चौधरी, सपोनी विक्रम साळुंखे, मपो सई वनवे व स्टाफ उपस्थित होते.

## लॅबोरेटरीला आतून कुलूप लावून चालकाची आत्महत्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**बार्शी :** लॅबोरेटरीचे शटर आतून बंद करून तरुण चालकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार बार्शी शिवाजीनगर शहरात परिसरात घडला. गणेश नाईकवाडी (वय २८, रा. पानगाव, ता. बार्शी), असे आत्महत्या केलेल्या लॅबोरेटरी चालकाचे नाव असून, बार्शी शहरात अहिल्याबाई होळकर उद्यानाजवळ ही लॅबोरेटरी आहे. आतून कुलूप लावून त्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस येताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी शटर उचकटून पंचनामा केला त्यानंतर मृतदेह रुग्णालयात शवविच्छेदनासाठी हलविण्यात आला. आत्महत्येमागील कारण समजलेले नाही.

## कारखान्यावर कारवाईची केली मागणी

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील 23 साखर कारखान्यांना नोटीसा देण्यात आली. जिल्ह्यातील साखर कारखाने सुरुसुरू दोन महिने झाले तरी अद्याप शेतकऱ्यांच्या खातातखात्यात एफआरपी रक्कम जमा नाही, शेतकरी संघटनेसह ऊस उत्पादक शेतकऱ्यांचीशेतकऱ्यांनी साखर कारखान्यावरकारखान्यांवर कारवाईची मागणी केली. सोलापूर जिल्ह्यातील बड्डे नेत्यांच्या साखर कारखान्यांचा आहे. जिल्ह्यातील 23 साखर कारखान्यांना सोलापूरच्या प्रादेशिक सहसंचालकांनी नोटीस बजावली, आठ दिवसातदिवसांत ऊस उत्पादकांचे पैसे द्या. विजय रणदिवे, स्वाभिमानेस्वाभिमानी संघटना यांनी दिलाही मागणी केली आहे.

## डॉ. सुजीत मिश्रा सोलापूर विभागाचे नवे डीआरएम




**सोलापूर :** डॉ. सुजीत मिश्रा यांनी नुकताच मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाचे नवीन विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM) म्हणून पदभार स्वीकारला. डीआरएम, सोलापूर विभागाचा पदभार स्वीकारण्यापूर्वी ते भारतीय रेल्वे इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट (IRITM), लखनौ येथे वरिष्ठ प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यांनी नीरज कुमार दोहरे यांच्याकडुन पदभार स्वीकारला. त्यांनी अनेक दशकांच्या कारकिर्दीत, त्यांनी भारतीय रेल्वेमध्ये विविध पदांवर सेवा केली आहे.




## नारायण चिंचोली येथील ग्रामदैवत
# सूर्यनारायण देव यात्रा उत्सव सुरू; ग्रामपंचायत सज्ज

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथील ग्रामदैवत असलेल्या सूर्यनारायण देवाची यात्रा मोठ्या उत्साह सुरू झाली असून ही यात्रा 31 डिसेंबर पासून सुरू असून ही यात्रा पुढे संपूर्ण महिनाभर 28 जानेवारीपर्यंत महिनाभर सुरू असते .परंतु यात्रेचा कालावधी हा रथ सप्तमी पर्यंत असल्याचे पुजारी गणेश अवताडे यांनी सांगितले.

पंढरपूर - सोलापूर -रोडवर अवघ्या दहा किलोमीटर वर असणाऱ्या नारायण चिंचोली येथे पुरातन हेमाडपंथी सूर्यनारायणाचे मंदिर असून हे मंदिर अति प्राचीन असून हे मंदिर अत्यंत दुर्मिळ व कोरीव बांधकाम असलेले महाराष्ट्रातील एकमेव असे मंदिर आहे. नारायण चिंचोली येथे सूर्यनारायण देव यात्रेनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातून हजारो भाविक पौष महिन्यामध्ये दर्शन घेण्यासाठी येत असतात .आलेल्या भाविकांसाठी सर्व प्रकारच्या देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा करण्यात आली असल्याची माहिती नारायण चिंचोली चे ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने करण्यात आल्याची माहिती सरपंच नर्मदा लक्ष्मण धनवडे, पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे संचालक तथा नारायण चिंचोली चे माजी सरपंच लक्ष्मण धनवडे, उपसरपंच गहिनीनाथ चव्हाण यांनी दिली. नारायण चिंचोली येथे संपूर्ण राज्यातून हजारो भाविक येत असतात या भाविकांना मूलभूत सुविधांसह सुलभ दर्शनाची सोय करण्यात आले असल्याची माहिती सूर्यनारायण देव ट्रस्टचे अध्यक्ष विजय कोळेकर यांनी दिली. नारायण चिंचोली येथे महाराष्ट्रातील एकमेव असे पुरातन सूर्यनारायण देवाचे मंदिर असून विशेषतः रविवारी मोठ्या प्रमाणात यात्रा भरते . महिन्यातील 14 जानेवारी रोजी मकर संक्रमणाचा काळ असून यावेळी सूर्याची उगवते किरणे मूर्ती वरती पडतात. हा उत्सव पाहण्यासाठी तालुक्यात जिल्ह्यातील हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात. तरी पंचक्रोशीसह तालुक्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आव्हान ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने व सूर्यनारायण देव ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. ही यात्रा पार पाडण्यासाठी सूर्यनारायण देव ट्रस्ट संचालक मंडळ, ग्रामपंचायत प्रशासन, विविध सामाजिक संघटना मोठ्या उत्साहाने पार पाडत असतात.

संपादकीय विशेष

# राजकीय समीकरणे बदलताहेत...

अलिकडेच तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनी 'इंडिया' आघाडीचे नेतृत्व करण्यास तयार असल्याचे सांगितले तेव्हा 'इंडिया' आघाडीमध्ये सर्व काही ठीक नाही, याचे संकेत मिळाले. उद्योजक गौतम अदानी प्रकरणावरून काँग्रेस संसदेत गोंधळ घालत असताना हे ममता यांचे हे वक्तव्य आल्यानंतर 'इंडिया' आघाडीमधील इतर सर्व पक्ष अदानी मुद्द्याला महत्त्व देण्यास फारसे तयार नसल्याचे स्पष्ट झाले. काँग्रेसला या मुद्द्यावर प्रादेशिक पक्षांपुढे झुकावे लागले, हे विचित्र आहे. ममता या 'इंडिया' आघाडीच्या योग्य नेत्या असल्याच्या विधानांना इतर काही नेत्यांनी आणि विशेषतः लालूप्रसाद यादव यांनीही पाठिंबा दिला होता. अलीकडेच आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी दिल्लीतील काही काँग्रेस नेत्यांवर दिल्ली लोकसभा निवडणुकीत 'आप'चा पराभव करून भाजपच्या विजयाला हातभार लावल्याचा आरोप केल्यामुळे 'आप' आणि काँग्रेसमधील दरी वाढत चालली आहे. हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसने युती न करता स्वबळावर निवडणूक लढवल्यापासून या दोन पक्षांमध्ये अंतर वाढले आहे.

दरम्यान, आम आदमी पक्षाचे नेते काँग्रेसवर संतप्त झाले आहेत. अजय माकन यांनी तर केजरीवाल यांच्यावर फसवणुकीचा आरोप केला आहे. ज्या केजरीवाल यांनी तत्कालीन मुख्यमंत्री शीला दीक्षित यांचा पराभव केला, त्यांचे चिरंजीव माजी खासदार संदीप दीक्षित हेच आता केजरीवाल यांच्या विरोधात विधानसभेची निवडणूक लढवणार आहेत. 'आप'ने खासगी संस्थांमार्फत सुरू केलेल्या सर्वेक्षणाविरोधात दीक्षित यांनी आता उपराज्यपालांकडे तक्रार केली आहे. 'आप'ची महत्त्वाकांक्षी 'महिला सन्मान योजना' आता चौकशीच्या फेऱ्यात अडकली आहे. 2013 मध्ये आम आदमी पक्षाला पाठिंबा देऊन सरकार स्थापन करणे ही काँग्रेसची चूक होती, असे माकन यांनी अलिकडे म्हटले. गेल्या लोकसभा निवडणुकीत दिल्लीत आम आदमी पक्षाशी झालेली आघाडीही त्यांनी अयोग्य ठरवली.

काँग्रेसच्या नेतृत्वाखाली 'इंडिया' स्थापना झाली, तेव्हा ही आघाडी केवळ भाजपला पर्यायी धोरणे आणि विचारांद्वारे विरोध करणार नाही, तर देशाला राजकीय दिशा देण्याचे काम करेल, असे मानले जात होते; परंतु ती पर्यायी विचार देऊ शकली नाही. 'इंडिया' आघाडी देशासमोर कोणताही प्रभावी दृष्टीकोन किंवा किमान समान कार्यक्रम मांडू शकली नाही. भाजपला राज्यघटना बदलायची आहे, असे वातावरण काँग्रेसच्या नेतृत्वाखालीच निर्माण झाले. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला 99 जागा मिळाल्या आणि भाजपच्या जागा 240 वर आल्या, तेव्हा विरोधी 'इंडिया' आघाडीचा विजय झाल्यासारखे वातावरण तयार करण्यात आले. हा प्रचार काँग्रेसने सर्वाधिक केला; पण हरियाणा आणि नंतर महाराष्ट्र निवडणुकीच्या निकालांनी लोकसभेच्या निवडणुकीतील 'इंडिया' आघाडीने मिळवलेला विजय हा अपघात होता, हे सिद्ध झाले. कर्नाटक, तेलंगणा, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, हिमाचल आणि काही प्रमाणात हरियाणा-पंजाबमध्ये काँग्रेसचे प्रभावी अस्तित्व आहे. इतर राज्यांमध्ये ती एक तर खूपच कमकुवत आहे किंवा प्रादेशिक पक्षांच्या दयेवर आहे. लोकसभेमध्ये दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून तो नक्कीच उदयास येतो; पण त्यात मित्रपक्षांचे योगदान आहे.

दिल्ली विधानसभा निवडणुकीमध्ये केजरीवाल काँग्रेससोबत समन्वय साधणार नसल्याचे दिल्लीमध्ये आधीच स्पष्ट झाले होते. दिल्लीमध्ये आम आदमी पक्ष, भाजप आणि काँग्रेसमध्ये तिरंगी लढत होऊ शकते. गेल्या दहा वर्षांच्या सत्ताविरोधी समस्येवर मात करण्यासाठी आम आदमी पक्ष जोरदार प्रयत्न करत आहे. तिरंगी लढत न झाल्यास भाजपकडून 'आप'चा पराभव होईल. भाजपसाठी तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. काँग्रेसने दिल्लीमध्ये जोर लावून निवडणूक लढवू नये, असे 'आप' ला वाटते, तर दिल्लीत काँग्रेसची ताकद वाढल्यासच 'आप'चा पराभव करता येईल, असे भाजपचे गणित आहे. दिल्लीत जोरदार मुकाबला करायचा असेल, तर भाजपसह काँग्रेसला 'आप'वर हल्लाबोल करावा लागणार आहे. दिल्लीनंतर बिहार विधानसभेची निवडणूक होणार आहे. तिथे झारखंडमधील झारखंड मुक्ती मोर्चाप्रमाणेच काँग्रेस राष्ट्रीय जनता दलावर अवलंबून असेल. काँग्रेसला स्वतःचे भले करायचे असेल तर प्रादेशिक पक्षांसारखे राजकारण करणे टाळावे लागेल. काँग्रेसने जातनिहाय जनगणना, दलित आणि मागासवर्गीयांचे एकत्रीकरण, अल्पसंख्याकांचे तुष्टीकरण, आंबेडकरांचा वारसा आदींच्या आधारे राजकारण केले, तर प्रादेशिक पक्षांना अडचणी येतील असा अंदाज आहे.

नितीशकुमार यांनी 2022 मध्ये 'यूपीए'च्या विस्ताराची कल्पना मांडली. यासाठी त्यांनी केजरीवालांपासून ममता बॅनर्जींपर्यंत आणि अखिलेश यादवांपासून माकपच्या सीताराम येचुरींपर्यंत सर्वांशी संपर्क साधून रणनिती आखली. त्यानंतर जुलै 2023 मध्ये 26 पक्षांसोबत 'इंडिया' आघाडी तयार झाली. त्यात द्रमुक, राष्ट्रवादी काँग्रेस, झारखंड मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय जनता दल या पक्षांचा भारत आघाडीमध्ये समावेश होता. समाजवादी पक्ष, 'आप', तृणमूल काँग्रेस, 'बीएपी' आणि 'आरएलपीए' यासारखे नवीन पक्षही आघाडीत सामील झाले. तथापि, जानेवारी 2024 मध्ये नितीशकुमार यांनी आघाडी सोडत 'एनडीए'मध्ये सामील झाले होते. समाजवादी पक्ष हा लोकसभेतील तिसरा सर्वात मोठा पक्ष 'इंडिया' आघाडीमध्ये असला, तरी अनेक प्रसंगी या पक्षाने समाजवादी पक्षापेक्षा वेगळी भूमिका घेतली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या संभल दौऱ्यावरून दोन्ही पक्षांमध्ये मतभेद झाले होते. आता अखिलेश यांनी दिल्ली निवडणुकीत आम आदमी पक्षाला पाठिंबा देऊन आपले इरादे व्यक्त केले आहेत. ममता यांच्या तृणमूल काँग्रेसचाही 'इंडिया' आघाडीमध्ये समावेश आहे; परंतु ममतांनी गेल्या तीन वेळा काँग्रेसला धक्का दिला आहे. येचुरी यांच्या निधनानंतर काँग्रेस आणि माकपमधील संबंधही चांगले चाललेले नाहीत. केरळमध्ये 2026 मध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. तिथे मुख्य लढत माकप आणि आणि काँग्रेस आघाडीमध्ये आहे. राष्ट्रीय लोकतांत्रिक पक्ष हा हनुमान बेनिवाल यांचा पक्ष असून सहा महिन्यांनंतर त्यांचे काँग्रेससोबतचे संबंध बिघडले. भारतीय आदिवासी पक्षाचा 2024 मध्ये 'इंडिया' आघाडीत समावेश करण्यात आला. एकंदरीत, इंडिया आघाडीतील दरी चांगलीच रुंदावली आहे.

# निर्लेप आनंद लुटू या

नवीन वर्ष सुरू होत असताना दिवसेंदिवस जटील होत जाणाऱ्या मानसिक समस्या आणि अस्वास्थ्याकडे अधिक गांभीर्याने बघण्याची गरज कधी नव्हे इतक्या तीव्रतेने जाणवत आहे. त्यामुळेच सरत्या वर्षाला निरोप देताना या विषयाची व्यापकता समजून घ्यायला हवी. यायोगे आपण चांगल्या मनोव्यवस्थेनिशी नववर्षाचे स्वागत करु शकू. आतापर्यंत मानसिक आरोग्य ही इतर आरोग्याच्या बरोबर जाणारी एखादी गोष्ट होती. याच दृष्टीने सगळे त्याकडे बघत होते. मात्र कोव्हिडनंतरच्या काळात परिस्थिती बदलली. मानसिक अस्वास्थ्य असल्यास केवळ मानसिक स्थितीच बदलते असे नाही तर तुमच्या आयुष्याचा अनुभव कंटाळवाणा, निराशाजनक असतो हेदेखील समजले. एवढेच नव्हे तर, यामुळे होणारे शारीरिक आजार, मनाचा, शरीराचा दुबळेपणा, वाढता संसर्ग यासारखे धोकेदेखील प्रकर्षाने समोर आले आणि हा विषय घुसळून निघाले. याचा अर्थ आता मानसिक रुग्ण वाढले आहेत, असा होत नाही पण मानसिक त्रास नक्कीच वाढला आहे. त्यामुळेच नव्या वर्षाचे स्वागत करताना ही मन:स्थिती सुधारण्याचा प्रयत्न व्हायला हवा.

पूर्वी 10 ते 15 टक्के लोकांना इतर व्याधींप्रमाणेच काही मानसिक आजार होते. त्यावर आम्ही इलाज करत आलो आहोत. मात्र आता हे प्रमाण जवळपास 40 टक्क्यांपर्यंत पोहोचले असून या लोकांना कोणाच्या वा कोणत्या तरी मदतीची गरज लागत असल्याचे समोर आले आहे. तपशिलात जाऊन विचार करता आपल्या देशामध्ये या 40 टक्क्यांमध्ये करोडो लोकांचा समावेश होतो, हे स्पष्ट आहे. अर्थातच आधी उल्लेख केल्याप्रमाणे यातील सगळेच मनोरुग्ण नाहीत. मात्र त्यांना मानसिक अस्वस्थपणा जाणवण्याइतका आहे. त्याची कारणे वेगवेगळी आहेत. कौटुंबिक विवाद, शारीरिक व्याधी, व्यवसाय-धंद्यातील अडचणी आदी कारणांमध्ये कमालीची वाढ झाल्याचा हा परिपाक आहेच, खेरीज मानसिक आरोग्य धोक्यात येण्याचे वयही आता कमी कमी होत आहे. यात साधारणपणे 35 ते 40 वर्षे वयोगटाचा समावेश नोंद घेण्याइतका वाढला आहे, कारण त्यांना पुढच्या पिढीची सर्वाधिक चता आहे. आपल्या मुलांचे शिक्षण, शिकल्यानंतर मिळणाऱ्या रोजगारसंधी, अर्थार्जन, त्यांचे वैवाहिक आयुष्य अशा एक ना अनेक गोष्टींबद्दल त्यांना चता सतावते तर दुसरीकडे आपल्या प्रौढावस्थेतील पालकांच्या वृद्धापकालीन स्थितीविषयीही ते चिंताक्रांत दिसतात. पालकांची म्हातारपणी उद्भवणारी दुखणी, त्याचा खर्च, त्यांच्याकडे लक्ष देणे आदी विषय या पिढीच्या अस्वास्थ्यामध्ये भर टाकत आहेत. म्हणूनच नव्या वर्षात प्रवेश करताना या पिढीने मानसिक आरोग्य जपण्यासाठी विशेष प्रयास घेण्याची गरज लक्षात घ्यायला हवी.

**सध्या जवळपास सर्व क्षेत्रांमध्ये पराकोटीचा संघर्ष दिसतो. नोकरी, धंद्यामध्ये संधी न मिळणे, क्षमता असूनही ती सिद्ध करण्याचा मार्ग न सापडणे यासारखे नानाविध विषय युवावर्गाच्या चिंतेमध्ये भर घालत आहेत. लोकांच्या आहे त्या नोकऱ्या जात आहेत. त्यामुळेच येत्या काळातही हा वर्ग चिंताग्रस्त राहणार, याविषयी शंका नाही. पण नव्या वर्षामध्ये त्यातील अनेक प्रश्न मार्गास लागतील असेही मला वाटते.**

हा वर्ग भरडला जाण्याला वाढती स्पर्धादेखील कारणीभूत आहे. सध्या जवळपास सर्व क्षेत्रांमध्ये पराकोटीचा संघर्ष दिसतो. नोकरी, धंद्यामध्ये संधी न मिळणे, क्षमता असूनही ती सिद्ध करण्याचा मार्ग न सापडणे असे नानाविध विषय या वर्गाच्या चिंतेमध्ये भर घालत आहेत. लोकांच्या आहे त्या नोकऱ्या जात आहेत. त्यामुळेच येत्या काळातही हा वर्ग चिंताग्रस्त राहणार, याविषयी शंका नाही. पण नव्या वर्षामध्ये यातील काही प्रश्न मार्गास लागतील असेही मला वाटते. जसे की, 'एआय'चे पुढे काय होणार याची आपल्याला या वर्षी पूर्ण कल्पना येईल आणि आपल्या आयुष्यातील त्याचे स्थान निश्चित करणे सोपे होईल. दुसरी बाब म्हणजे सरत्या वर्षामध्ये देश आणि राज्य पातळीवरील दोन महत्त्वाच्या निवडणुकांमधून आपण बाहेर आलो आहोत. आता दोन्ही सरकारे स्थिरावली आहेत. ग्रामपंचायती वा नगर परिषदांच्या निवडणुका प्रस्तावित असल्या तरी त्याचा परिणाम इतका व्यापक नसेल. या अनुषंगाने 2024 मध्ये बघायला मिळालेली अस्वस्थता 2025 मध्ये बघायला मिळणार नाही. सध्याच्या स्थिरतेबरोबर आपण काही करु शकतो का, याचा विचार आणि विश्वास आता लोकांच्या मनात निर्माण होईल आणि मानसिक स्थिती सुधारेल, अशी आशा आहे. आता समाज पुढे घडणाऱ्या सकारात्मक गोष्टींचा विचार करु शकेल. त्या दृष्टीनेही 2025 महत्त्वाचे ठरेल.

लक्षवेधी



डॉ. राजेंद्र बर्वे,
प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ

मधल्या काही काळात नोकऱ्या जाण्याची भीती खूप मोठी होती. मात्र येणाऱ्या वर्षामध्ये नोकरी-धंद्याचे वेगळे आयाम निर्माण होताना दिसतील. सामाजिक स्थितीचा आढावा घेताना बघायला मिळणारा वा व्यक्त होणारा हा बदलही अत्यंत महत्त्वाचा म्हणावा लागेल. जसे की, आता आयटीमध्ये नव्या संधी निर्माण होत असल्याची चर्चा असून ती युवावर्गातील मानसिक अस्वास्थ्य दूर करण्यास पूरक ठरताना दिसत आहे. हे प्रमाण वाढेल तसतसे मानसिक आरोग्यविषयक प्रश्नही कमी कमी होतील. वैयक्तिक पातळीवर बघायचे तर 2025 साठीच नव्हे तर पुढच्या काळासाठी मानसिक आरोग्य तोलून धरणारे खांब मजबूत करणे ही निकड असणार आहे. यातील पहिला खांब शारीरिक स्वास्थ्याचा आहे. त्यामुळेच येत्या काळात आपल्याला शरीराचे नियमन करणे गरजेचे ठरेल. रोजचा व्यायाम, ध्यानधारणा याकडे लक्ष देऊन हे नियमन साधता येईल. यासाठी फार नव्हे तर दिवसातील 20 मिनिटे स्वत:साठी दिली तरी पुरेसे होईल. कितीही काम असले तरी प्रत्येकाने हा वेळ स्वत:साठी राखून ठेवायलाच हवा. या 20 मिनिटांमधील 13 मिनिटे स्वस्थ बसून श्वासावर लक्ष ठेवावे. स्थिर राहण्याचा प्रयत्न करावा. यावेळी डोक्यात कोणताही विचार नसावा वा कोणत्याही प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न नसावा. उरलेल्या काळात तुम्ही लिखाण करु शकता. आपण कोणत्या गोष्टी करण्यासाठी सज्ज आहोत, कोणत्या गोष्टी करण्याने आपल्याला आनंद मिळेल हे तुम्ही लिहून काढू शकता.

वर्षाच्या अखेरपर्यंत आपल्याला काय मिळवायचे आहे, साधायचे आहे हे एकदा ठरले की मन नकळत त्यासाठी सज्ज होते आणि रोज ठेवला गेलेला हा हिशेब आपल्याला सकारात्मक वळणावर घेऊन जातो. त्यामुळेच 2025 मध्ये प्रत्येकाने करावी अशी ही बाब असल्याचे अगत्याने वाटते. या सगळ्या गदारोळामध्ये प्रत्येकाने दररोज कृतज्ञता व्यक्त करण्याचा व्यायामही करायला हवा. पालकांनी जन्म दिला, पालनपोषण केले, शिक्षकांनी शिकवले ही सगळीकडे दिसणारी बाब आहे. पण बारीकसारिक गोष्टींप्रतीही आपण कृतज्ञता व्यक्त करायला हवी, कारण यामुळे मिळणारी मन:शांती वेगळ्या पातळीवरची असते. त्याचबरोबर निसर्गाकडे पाहणे, त्यातील बदलांप्रती सजग असणे, निसर्गाचा मान ठेवणे हेदेखील येत्या काळात अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. आपण दररोज प्रवास करतो. रेल्वेच्या रुळांच्या अगदी जवळ गवत वाढलेले पाहतो. पण त्यावर फुललेली छोटी-छोटी फुले कितीजण पाहतात? त्यांचे देखणे रंग किती डोळ्यांना दिसतात? धकाधकीच्या प्रवासात क्षणभर तिकडे नजर टाकली आणि अशा रोपांभोवतीची माती, फुले पाहिली तरी खूप मोठे मानसिक समाधान मिळते. ट्रेन यायच्या वेळी येणारच असते. पण तोपर्यंत अस्वस्थ होण्याऐवजी अशा छोट्या छोट्या गोष्टींचा आनंद लुटला तर मानसिक आरोग्याचा प्रश्न बिकट होणार नाही.

आपण घाईत असतो. डोक्यात अनंत विचार सुरू असतात. पण त्याच वेळी सिग्नलजवळ छोटी मुले येतात आणि पैसे मागतात. पलिकडच्या पदपथावर या जगातील दु:खापासून दूर असणारी काही निरागस मुले उघड्या अंगाने खेळत असतात. हातात मिळालेल्या छोट्याशा तुटक्या-फुटक्या खेळण्याशी खेळण्यात, एकमेकांशी मस्ती करण्यात, जमिनीवरचे उचलून खाण्यात त्यांचा वेळ जात असतो. प्राप्त परिस्थितीने शिणलेल्या माणसांनी कधी तरी या परिस्थितीची जाणीव नसणाऱ्या मुलांकडेही बघायला हवे. जमली तर मदत करायला हवी. पैसे न देता जवळ बसवून त्यांना दोन घास द्यायला हवेत. ही प्रत्येक कृती आपल्या मनाची अवस्था सुधारुन जाईल, याची खात्री बाळगा कारण या छोट्याशा कृतीतून आपण खूप काही जमा करत असतो. समाधान घेत असतो. यालाच मी कृतज्ञता व्यायाम म्हणतो, जो आपल्यापैकी प्रत्येकाने करायला हवा.

याच पद्धतीने खिडकीत येणाऱ्या पक्षांच्या करामती बघण्याने, रस्ता ओलांडताना गोंधळलेल्या वृद्धांना हात दिल्याने, एकट्यांची क्षणभर सोबत केल्याने, जवळच्या नातेवाईकांची विचारपूस केल्याने, अनेक दिवस संपर्कात नसणाऱ्या मित्रमंडळींना एखादा कॉल केल्यानेही आपण मोलाचे अनेक क्षण साठवू शकतो. वरकरणी ही बाब अत्यंत सामान्य वाटू शकते, पण याचे प्रमाण आणि प्रभाव दीर्घकाळ टिकणारा असतो. तो पैशात न मोजता येणाऱ्या सुखाचे मनावर लेपन करुन जातो. मनातील शंका-कुशंकांवर हलकी फुंकर घालून जातो. म्हणूनच 2025 मध्ये असे निर्लेप सुख मिळवण्याचा प्रयत्न करु या आणि वधारलेल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यानिशी नव्या काळाचा आनंद लुटू या.

(शब्दांकन: स्वाती पेशवे)

# पतंगराव नव्हे रॉकेटराव !

महाराष्ट्रातील राजकारणात जवळपास तीस वर्ष आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमविणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले काँग्रेसचे जेष्ठ नेते, महाराष्ट्राचे माजी मंत्री पतंगराव कदम यांची आज ८१ वी जयंती. ८१ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ८ जानेवारी १९४४ रोजी पतंगराव कदम यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील सोनसळ या गावात एका गरीब कुटुंबात झाला.

त्यांचे चौथी पर्यंतचे शिक्षण गावातल्या शाळेत झाले तर सातवी पर्यंतचे शिक्षण शिरसगाव या गावात झाले. ११ वी पर्यंतचे शिक्षण म्हणजे त्या काळातील मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण त्यांनी कमवा व शिका योजनेअंतर्गत पूर्ण केले. एफ. वाय बी. ए नंतर त्यांनी टीचर्स डिप्लोमा पूर्ण केला व शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बांधून पुणे गाठले. पुण्यातील हडपसर येथे दहा बाय दहाच्या पत्र्याच्या खोलीत राहून त्यांनी गोरगरिबांच्या मुलांना शिकवण्याचे काम सुरू केले. शिक्षक असतानाच गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी काही तरी करावे असा विचार त्यांच्या मनात येऊ लागला त्यातूनच, भारती विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली गेली. बा. ग पवार, वसंतराव म्हेत्रे, महादर सर, नीलाखे सर अशा पाच लोकांना घेऊन त्यांनी १० मे १९६४ रोजी भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्यावेळी त्यांच्या खिशात अवघे ३८ रुपये होते.



हळूहळू भारती विदयापीठाचा विस्तार वाढू लागला. शहराप्रमाणे ग्रामीण भागातही भारती विद्यापीठाच्या पाट्या झळकू लागल्या. भारती विद्यापीठामुळे गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजीतून शिक्षण मिळू लागले. सर्वसामान्य कुटुंबातील मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. त्यांनी लावलेल्या भारती विद्यापीठाच्या रोपट्याचे आज वटवृक्ष बनले आहे. के.जी ते पी.जे असे सर्वप्रकारचे शिक्षण आज भारती विद्यापीठातून मिळत आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य महान असेच आहे.


भारती विद्यापीठाचा पसारा सांभाळीत त्यांनी राजकारणातही ठसा उमटविला. १९६८ साली एस टी महामंडळाच्या सदस्यपदी त्यांची निवड झाली. गाव तिथे एस टी ही योजना राबवून त्यांनी गावागावात एस टी पोहचवली. १९८५ साली त्यांनी अपक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवली. त्यात ते विजयी झाले. १९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत त्यांना काँग्रेसने त्यांना तिकीट दिले तेंव्हापासून १९९५ सालचा अपवाद वगळता ते सतत निवडून आले. २०१४ साली मोदी लाटेत अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला पण त्यांनी आपला गड राखला. या दरम्यान त्यांनी शिक्षण, सहकार, उद्योग, महसूल, वन या महत्वाच्या खात्याची मंत्रीपदे सांभाळली. इतकी वर्ष मंत्रीपदावर राहूनही त्यांच्यावर एकही आरोप झाला नाही यातच त्यांचा कारभार किती पारदर्शक होता, हे दिसून येते.

श्याम ठाणेदार,
पुणे

बेधडक आणि मनमोकळा स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य होते. ओठात एक आणि पोटात एक असे पतंगरावांच्या बाबतीत कधीच झाले नाही. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणण्याची त्यांची वृत्ती राजकारणात अभावानेच पाहायला मिळते. त्यांचे भाषण म्हणजे पर्वणीच. त्यांच्या भाषणात गावाकडचा रांगडेपणा असायचा.

त्यांच्या कामाचा धडाका देखील जबरदस्त असायचा. आपल्या मतदारसंघात त्यांनी कामाचा डोंगर उभा केला होता. आपल्या मतदारसंघात एमआयडीसी उभारून त्यांनी अनेक उद्योगधंदे आणले. सूत गिरण्या, साखर कारखाने, वाईन पार्क, भारती विद्यापीठ, भारती हॉस्पिटल उभारून मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती केली.

त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली. पतंगराव कदम यांना ८० व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!




## राशीभविष्य

- **मेष** : कला-गुणांना उत्तम वाव मिळेल. व्यवसायात नवे करार मार्गी लागतील. बाकी चिंता नसावी.
- **वृषभ** : एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रीत करा. महत्त्वाच्या निर्णयात धरसोडपणा टाळावा. येणी वसूल होतील.
- **मिथुन** : अपेक्षित साध्य झाल्याने समाधान लाभेल. स्वमताग्रह टाळायला हवा. नातलगांच्या भेटी होतील.
- **कर्क** : कसल्याही आमिषाला बळी पडू नका. अनुभवींचा सल्ला लक्षात घ्यावा. जोडीदाराचं सहकार्य लाभेल.
- **सिंह** : आजचा दिवस तुमच्यासाठी उत्तम राहील. गोष्टी मनाप्रमाणे घडतील. व्यवसायात उत्कर्ष होईल.
- **कन्या** : दिलासादायक घटना घडतील. नव्या योजनांना गती मिळेल. नोकरीसाठी मुलाखतीत यश मिळेल.
- **तूळ** : सरकारी कामं मनाजोगी होतील. कारकिर्दीत नवा उत्साह राहील. प्रियजनांच्या भेटीचे योग आहेत.
- **वृश्चिक** : व्यवसायात अचानक अडचणी येतील. मन विचलित होऊ शकेल. पुरेसा संयम बाळगायला हवा.
- **धनु** : कामाची आखणी करून घ्या. चैनीवर खर्च करणं टाळायला हवं. प्रेम प्रकरणात वाद संभवतात.
- **मकर** : कौटुंबिक चिंता वाढेल. नवे करार तुर्तास करू नयेत. निराशा वाढवणाऱ्या घटना संभवतात.
- **कुंभ** : नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. घरातील ज्येष्ठांच्या प्रकृतीची काळजी वाटेल. विचारानं रहायला हवं.
- **मीन** : अपेक्षित वार्ता कानी येईल. पती-पत्नीच्या नात्यात सुसंवाद ठेवावा. मानसिक स्वास्थ लाभेल.

सल्ला मोलाचा

## दूर करा त्वचेचा काळपटपणा

अनेकींना कोपर आणि गुडघा काळा पडण्याची समस्या असते. पण थोडी काळजी घेतली तर आपण कोपर आणि गुडघ्याचा काळपटपणा घालवू शकतो. ✻ कोपर आणि गुडघ्याचा काळपटपणा घालवण्यासाठी लिंबू अत्यंत उपयुक्त आहे. वापरलेल्या लिंबाच्या फोडी टाकून देण्याऐवजी त्यात अर्धा टी स्पून मीठ आणि साखर घालून ती फोड कोपर आणि गुडघ्यावर घासा. कोमट पाण्यानं तो भाग धुवून टाका. ✻ गुडघा तसंच कोपराचा काळपटपणा दूर करण्यासाठी पपईचा वापर करा. पपईमध्ये पपेन नावाचा घटक असतो. या घटकामुळे त्वचेचं नैसर्गिक क्लिंजिंग होतं तसंच पपईतलं अ आणि क ही जीवनसत्वही काळपटपणा दूर करतात. यासाठी पपईचा तुकडा दह्यात मिसळून हे मिश्रण काळपट पडलेल्या भागावर लावा. ✻ ऑलिव्ह, बदाम किंवा खोबरेल तेलाने काळपट भागावर मसाज केल्यामुळेही काळपटपणा दूर होतो. नैसर्गिक तेलांमध्ये ई जीवनसत्व असतं. या जीवनसत्वामुळे कोरडी त्वचा मुलायम होते.

## ९ जानेवारी

दिनविशेष

- **१९२२** : जैव रसायनशास्त्रज्ञ हरगोविंद खुराना यांचा जन्म.
- **१९३४** : प्रख्यात पार्श्वगायक महेंद्र कपूरचा जन्म.
- **१९५१** : न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्रांचे मुख्य कार्यालय सुरु झाले.
- **२०१३** : राज्यातील भीषण दुष्काळावर मात करण्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीअंतर्गत ७७८ कोटी रुपये निधीचा निर्णय घेतला.
- **२०१४** : काही अटींवर होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथीची औषधे वापरण्यास परवानगी देण्यात आली.

महत्त्वपूर्ण काही...

## अधिक अचूक वेळेसाठी...

पारंपरिक घड्याळांमध्ये एका स्प्रिंगच्या साहाय्याने ऊर्जा पुरवली जायची. या ऊर्जेद्वारे चाके फिरवून त्यातील काटे फिरवले जात. हे काटे नियंत्रित गतीने फिरण्यासाठी घड्याळात बॅलन्स व्हील किंवा लंबकाचा वापर केला जाई. स्थिर कंपनसंख्येमुळे स्फटिक हा यासाठी अचूक पर्याय ठरला. १९२७ मध्ये अमेरिकेतील बेल टेलिफोन लॅबोरेटोरीजच्या वॉरेन मॅरिसन आणि जे. डब्लू. हॉर्टन यांनी क्वार्ट्झवर आधारलेलं सर्वात पहिलं घड्याळ बनवलं. (क्वार्ट्झ म्हणजे स्फटिकाच्या स्वरूपातील सिलिकॉन डायऑक्साइड.) बॅटरीवर चालणाऱ्या या घड्याळ्यातल्या क्वार्ट्झवरील विद्युतदाबामुळे क्वार्ट्झ ठरावीक कंपनसंख्येने कंप पावू लागतो. एका इलेक्ट्रॉनिक सर्किटद्वारे या स्थिर कंपनसंख्येचे विद्युत स्पंद निर्माण केले जातात आणि त्याद्वारे घड्याळातील चाके नियंत्रितपणे फिरवली जातात. क्वार्ट्झची घड्याळे महिन्याला फार तर काही सेकंद पुढे-मागे होतात. १९५५ मध्ये लंडनच्या नॅशनल फिजिकल लॅबोरेटोरीमध्ये सिझियमच्या अणूंच्या कंपनावर आधारील घड्याळ तयार केलं गेलं. हे घड्याळ दिवसाला फक्त ०.०००१ सेकंद मागे-पुढे होत होतं.

आरोग्यमंत्र

## व्हावे तातडीचे उपचार

आजकालच्या वाढत्या ताण-तणावाच्या, धावपळीच्या जमान्यात कधी कोणता विकार डोकं वर काढेल सांगता येत नाही, अशी परिस्थिती आहे. यात काही व्याधी साध्या तर काही जीवघेण्या ठरु शकतात. अर्थात, कुठल्याही व्याधीची लक्षणं दिसत असतात. या लक्षणांकडे लक्ष देऊन वेळेत उपचार सुरू केले तर व्याधींचं गांभीर्य आणि होणारे दुष्परिणाम कमी होऊ शकतात. याचाच एक भाग म्हणून लघवीच्या वेळी होणारी जळजळ, पोटात कळ येणं आणि लघवीतून रक्त पडणं या समस्येकडे पहायला हवं.



लघवीच्या वेळी होणारी जळजळ, पोटात कळ येणं किंवा लघवीतून रक्त जाणं अशा स्वरूपाचा त्रास सातत्यानं होत असेल तर तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा. लघवीच्या बदलत्या रंगाकडेही जागरुकतेनं लक्ष द्यावं. लघवीच्या वेळी जळजळ होणं आणि मूत्र अथवा शौचावाटे रक्त पडणं ही काही व्याधींची लक्षणं आहेत. उदा. मूत्रमार्गाचा संसर्ग असेल तर लघवीच्या वेळी जळजळ आणि लघवीतून रक्त पडण्याचा त्रास होऊ शकतो. प्रामुख्यानं महिलांना ही समस्या सतावू शकते. किडनी स्टोनचा त्रास असल्यासही लघवीतून रक्त पडण्याची शक्यता असते. त्यामुळेच त्वरित तज्ज्ञांचा सल्ला घ्यायला हवा. पित्ताशयाच्या ट्युमरचंही हे एक लक्षण असू शकतं. त्यामुळे या समस्येवर वेळीच उपचार गरजेचे ठरतात.

पंचांग

**गुरूवार, ९ जानेवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
पौष शु. १०, नक्षत्र : भरणी
चंद्रराशी : मेष, साध्य योग
सूर्योदय : ७.१३, सूर्यास्त : ६.१७

फॉरवर्डस

प्रेमाच्या माणसाला काही सांगावं तर त्याचा पत्ताच नव्हता...

**लिफाफे हिफाज़त करते रहे खतों की बेवजह ही,
पता जिसका था, वही लापता रहा!**

वाचा तर खरं

पदार्थांची खुमारी वाढवणारं केशर अनेक औषधी गुणांनी युक्त आहे. जखम भरण्यासाठी केशरमिश्रीत दुधाचा लेप लावला जातो. दररोज केशरमिश्रीत दुधाचं सेवन केल्यास अपचन, गॅसेसची समस्या दूर होते. केशरामुळे शारीरिक ऊर्जा वाढण्यास मदत होते. केशर, बदाम आणि मध यांचं मिश्रण शारीरिक तंदुरुस्ती देणारं ठरतं. थंडीमध्ये शरीराची उष्णता राखून ठेवण्यासाठी केशराचं सेवन महत्त्वाचं ठरतं. सर्दी खोकला किंवा बारीक ताप असेल तर एक चमचा गरम दुधात केशर आणि एक चमचा मध घालून प्यावं. आराम मिळतो.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

» Selected

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक अधिकारीपदी पाटील रुजू

**बारामती :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, बारामती प्रादेशिक कार्यालयाच्या प्रादेशिक अधिकारीपदी हनुमंत पाटील



यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी सोमवारी (६ जानेवारी) या पदाचा पदभार स्वीकारला. पाटील यांनी यापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे खाजगी सचिव, बारामती, फलटण, दौंड व गडहिंग्लज तालुका तहसीलदार, उत्तर सोलापूर व मोहोळ तालुक्यात नायब तहसीलदार या पदावर काम केले आहे. सेवा कालावधातील पुणे व कोल्हापूर जिल्ह्यात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल 'आदर्श तहसीलदार' म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आले. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, बारामती असा कार्यालयाचा पत्ता आहे.

## एसटी बंद असल्याने विद्यार्थिनींचा धोकादायक प्रवास

**रांजणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील गावांना जाणाऱ्या मंगरूळ पारगाव, भागडी, नागापूर या एस . टी . बस गाड्या बंद आहेत. त्यामुळे प्रवासी, शाळकरी विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात सुरु असलेले हाल कायम आहेत. शाळकरी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात ये -जा करण्यासाठी धोकादायक प्रवास करावा लागत आहे. विद्यार्थिनींचे मोठे हाल सुरू आहेत. तालुक्याच्या पूर्व भागात चांडोली, थोरांदळे, रांजणी, वळती, नागापूर या गावांना जाणाऱ्या अनेक एसटी बस गाड्या अनेक दिवसांपासून बंद केल्या आहेत. सकाळी ७ वाजता शिंगवे, त्यानंतर ९ वाजता पिंपरखेड या दोनच एसटी बस गाड्या सध्या सुरु आहेत. त्यानंतर दिवसभर एकही एसटी बस गाडी सुरू नाही. ११ वाजल्यानंतर सायंकाळी ७ वाजे पर्यंत बस स्थानकात ताटकळत बसावे लागत आहे. एसटी बस सेवा बंद झाल्याने शाळकरी विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेष करून महाविद्यालयात शिकणाऱ्या मुलींचे सध्या हाल सुरु आहेत. महाविद्यालयात ये - जा करताना त्यांना धोकादायक प्रवास करावा लागत आहे. भागडी, नागापूर या एसटी बस गाड्या सुरू करण्यासाठी विद्यार्थ्यांनी अनेकदा मंचर आगारात निवेदने दिली.

## नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांवर कारवाई करा

**बारामती :** येत्या १४ जानेवारी रोजी मकर संक्रांत हा सण असुन या सणाला संपूर्ण भारतासह महाराष्ट्रात पतंग उडवण्यात येतात. पतंग



उडवण्यासाठी नायलॉन मांजाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. त्यामुळे कितीतरी पक्षी याचे शिकार झाले असुन, मोठ्या प्रमाणात जिवीतहानीही होते. दुचाकीस्वार यांच्या गळ्याला मांजा लागून, मोठे अपघात वारंवार होत आहेत. तसेच कित्येक बळीही गेलेले आहेत. अशा वारंवार घटना घडु नये यासाठी त्याच्या विक्रीवर बंदी घालावी, तालुक्यातील सर्व दुकानदार यांना नायलॉन मांजा विक्रिस सक्त मनाई करावी तसेच अवैध विक्री करणा-यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्राहक पंचायतीच्या वताने करण्यात आली. यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत बारामती तालुकाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

## पत्रकार दिनानिमित्त शिवरी येथे पत्रकारांचा सन्मान



**वाल्हे :** शिवरी येथे नियोजित पत्रकार भवन बांधकाम स्थळी पुरंदर तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने ६ जानेवारी मराठी पत्रकार दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या वतीने तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. तर यावेळी पत्रकार भवन बांधकामातील पीसीसी कामाचे पूजन करण्यात आले या कार्यक्रमाचे पौराहित्य संतोष जंगम यांनी केले. यावेळी उद्योजक दिपक साखरे, डॉ. प्रवीण जगताप, उद्योजक दिनेश भिंताडे, स्व. एकनाथ काका प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, दिपक जांबळे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष बळीराम सोनवणे, आप्पा भांडवलकर, नारायण शिवरकर, प्रमोद इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुरंदर तालुका मराठी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष दत्ता भोंगळे, जिल्हाध्यक्ष सुनील लोणकर, बी.एम.काळे, प्रकाश फाळके, सुनील धिवार, तालुकाध्यक्ष योगेश कामथे, उपाध्यक्ष प्रवीण नवले, सचिव अमोल बनकर, सहसचिव मंगेश गायकवाड, समन्वयक किशोर कुदळे, कोषाध्यक्ष निलेश भुजबळ, कार्यकारणी सदस्य संतोष डुबल, समिर भुजबळ, चंद्रकांत चौंडकर, निखिल जगताप, सदस्य संतोष जंगम, दत्ता जाधव, निलेश जगताप, हनुमत वाबळे, राजेंद्र शिंदे, छाया नानगुडे, सुजाता गुरव, नवनाथ राणे, शिवाजी राणे, गिरीश झगडे, रामदास लांघी, शिवदास शितोळे, चंद्रकांत झगडे, निलेश झेंडे, राजेश काकडे, विजय पवार, महावीर भुजबळ, अक्षय कोलते आदी पत्रकारांचा यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निखिल जगताप यांनी केले, तर आभार राजेंद्र शिंदे यांनी मानले.

# स्थानिक स्वराज्य संस्थेत महायुतीच!

### कान्हूर मेसाईच्या श्रीमेसाई देवीच्या दर्शनवेळी एकनाथ शिंदेंचे वक्तव्य

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** गेल्या काही वर्षात महायुती सरकारने जलदगतीने कामे करत, अडीच वर्षांत विकासाचे अनेक निर्णय घेतल्याने, जनतेने इतिहासात प्रथमच महायुतीला भरघोस यश दिले आहे. आता पुढील काळात महानगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती मताधिक्क्याने जिंकेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.



कान्हूर मेसाई (ता. शिरुर) येथील श्रीमेसाई देवीच्या पटनाम सोहळावेळी देवीच्या दर्शनासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आले होते, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, माढाचे अध्यक्ष माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, जुन्नरचे आमदार शरद सोनवणे, तहसीलदार बाळासाहेब म्हस्के, सरपंच राजश्री रुपनेर, उपसरपंच योगेश पुंडे, शिवसेना तालुकाध्यक्ष रामराव सासवडे, पोपट धोत्रे, बापू शिंदे, बबन शिंदे, सोपान जाधव, यांसह आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना, श्रीमेसाई देवीच्या दर्शनासाठी मी नेहमी येत असतो, सध्या शिरुरला बरेच वर्षाने देवीच्या दर्शनाला आलो आलो आहे. येथे आल्याने अनेक वर्षापूर्वीच्या आठवणी मला मिळाल्या असून, सर्वसामान्य लोकांच्या व्यथा समजल्या आहेत. सध्या कान्हूर मेसाई गावात खूप बदल झाला असून, येथील लाडक्या बहिणी मला भेटल्या असल्याचे सांगत, मराठी भाषेला अभिजात भाषेचा निर्णय झाल्यानंतर आजच त्याबाबत आज शासन निर्णय निघाला असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विधानसभा निवडणुकीत महायुतीला जनतेने मोठा कौल दिला, त्यामुळे आम्ही जोमाने काम करतोय आणि आमची जबाबदारी वाढली असल्याचेही ते म्हणाले.

यावेळी शिरुर तालुक्यातील बारा गावांच्या पाणी प्रश्नाबाबत बोलताना येथील पाण्याच्या प्रश्नाबाबत जिल्हाधिकारी व संबधित विभागांशी बोलतो, असे सांगत तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांना याबाबतचा अहवाल बनवून पाठवण्याच्या सूचना देखील एकनाथ शिंदे यांनी दिल्या. लवकरच प्रत्येक जिल्ह्याचे पालकमंत्री पदांची नेमणूक करुन प्रत्येक जिल्ह्याला न्याय दिला जाईल असे विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.

## रांजणगावात चोरी करणाऱ्यास रंगेहात पकडले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** रांजणगाव एमआयडीसी येथील अथर्व लोजिस्टिकचे गोडावून मध्ये टाटा मोटर्स कंपनीमध्ये तयार झालेल्या कार पार्किंग करुन ठेवलेल्या असताना एक इसम कारमधील पंक्चर कीट व ई व्ही चार्जिंग कीट चोरी करत असल्याचे विश्वास पाटील, भरत कोल्हे व मारुती देवळे या सुरक्षा रक्षकांना दिसले. त्यांनी सदर इसमाला पकडण्याचा प्रयत्न केला असता, इसम पळून जाऊ लागला.

सुरक्षा रक्षकांनी त्याला जागेवर पकडून ठेवत गोडावून व्यवस्थापक नवनाथ थेऊरकर यांना माहिती दिली. याबाबत नवनाथ झुंबर थेऊरकर यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून, पोलिसांनी संदीप मनोहर रासकर याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करत त्याला अटक केली आहे.

# प्लॅस्टिकमुक्त बाजार उत्साहात



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** आदर्शगाव भागडी (ता. आंबेगाव ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आनंददायी उपक्रमांतर्गत आनंदी बाजार व खाऊ गल्ली चे आयोजन करण्यात आले. सुरुवातीस सरस्वती पुजन व प्लॅस्टिक मुक्त अभिनयान साठी सहावी सातवीच्या विद्यार्थ्यांनी प्लॅस्टिक वापराचे दुष्परिणाम पथनाट्यातून सादर केले. या बाजारात २६ हजार १३० रुपयांची उलाढाल झाली.

शालेय विद्यार्थ्यांचे व्यवहार ज्ञान वृद्धिंगत व्हावे व त्यांच्यामध्ये व्यवहार कुशलता निर्माण व्हावी, संवाद कौशल्य मापन व परिणामांची प्रात्यक्षिक माहिती व्हावी या हेतूने सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या बाजाराचे वैशिष्ट्य म्हणजे तीन पिढ्या एकत्रित काम करत होत्या. नातू व नातीसाठी स्टॉल टाकण्यासाठी आजी आजोबा, आई वडील व स्वतः विद्यार्थी सर्वांची लगबग व बाजारात आपला स्टॉल आकर्षक होण्यासाठी चे प्रयत्न यातून कुटुंबाचे एकत्रित काम करण्याची आगळी वेगळा स्नेहभाव दिसुन आला.

अगदी पहिलीच्या मुलांपासून सातविपर्यंत बहुतांश मुलांनी भाज्या, फळभाज्या व कडधान्ये , फळे विक्रीस आणले होते. विविध प्रकारच्या खाद्यपदार्थाचे स्टॉल यामध्ये चहा, वडापाव इडली , पाणीपुरी , मेदूवडा इ .चे दुकाने शालेय विद्यार्थ्यांनी लावले होते. सदरच्या उपक्रमात सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य ज्येष्ठ नागरिक, शाळा व्यवस्थापन समिती पालक व ग्रामस्थ सहभागी झाले व त्यांनी शालेय भाजी बाजारात भाज्यांची खरेदी केले. तसेच खाद्य यात्रेस भेट दिली व विविध पदार्थांची चव अनुभवली. यावेळी बाजारामध्ये अंदाजे वीस हजार रुपयांची उलाढाल झाली. याप्रसंगी उपस्थितीतांनी उस्फूर्तपणे खरेदी केली. समवयस्क गटागटाने खरेदी व खाण्याचाही मनमुराद आनंद सर्वांनीच लुटला .पालकांनी या उपक्रमाचे कौतुक केले, अशा प्रकारचे उपक्रम वारंवार घ्यावेत अशी मागणी पालक वर्गातून करण्यात आली. या उपक्रमाबद्दल पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख,मुख्याध्यापक यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## पौष पौर्णिमेनिमित्त थापलिंग गडावर नवसाचे बैलगाडे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या नागापूर (ता. आंबेगाव) येथील श्री क्षेत्र थापलिंग गडावर खंडोबा देवाची यात्रा सोमवार (दि.१३) ते बुधवार (दि.१५) संपन्न होत आहे. या तीनही दिवशी नवसाचे बैलगाडे टोकन पद्धतीने पळवले जाणार आहेत. यासाठी शनिवारी ( दि.११ ) सकाळी ९ ते १२ या वेळेत थापलिंग देवस्थान येथे बैलगाडा मालकांना टोकन वाटप केले जाणार असल्याची माहीती थापलिंग देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष देवदत्त निकम यांनी दिली.

पौष पौर्णिमेनिमित्त थापलिंग गडावर खंडोबा देवाची यात्रा मोठी भरते. या यात्रेत दोन्ही दिवस नवसाचे बैलगाडे पळवले जातात. यासाठी बैलगाडा मालकांना कोणतीही बक्षिसे,इनाम दिला जात नाही. परंतु तरीदेखील बैलगाडा मालक यात्रेच्या दिवशी घाटात बैलगाडे पळवितात. यंदा प्रथमच तीन दिवस नवसाचे बैलगाडे घाटात टोकन पद्धतीने पळवले जाणार आहेत.

थापलिंग गडावर शनिवारी (दि.११) सकाळी ९ ते १२ या वेळेत बैलगाडा मालकांना टोकनचे वाटप केले जाणार आहे. सर्व नियम व अटींचे पालन करूनच बैलगाडे टोकन वाटप केले जाणार आहे. देवस्थान ट्रस्टच्या वतीने थापलिंग गडावर यात्रेची संपूर्ण तयारी करण्यात आली आहे.

## खेड घाटात कंटेनर आणि इको वाहनांचा अपघात



खेड घाटात अपघात झालेल्या इको वाहनांची अवस्था. (छाया- निखिल पाचारणे)

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** पुणे-नाशिक महामार्गावर खेड घाटात कंटेनर आणि दोन इको वाहनांचा विचित्र अपघात झाला. या अपघातात तीन प्रवाशांना गंभीर दुखापत झाली असून, एका वृद्ध महिलेचे हाड मोडले. अपघातातील इको वाहनांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. बुधवारी दुपारी चारच्या सुमारास हा अपघात घडला.

मंचर बाजूकडून राजगुरुनगरकडे जाणाऱ्या उतारावर एकाच लेन मधून ही वाहने मागे पुढे येत होती. अखेरच्या वळणाच्या उतारावर एक इको वेगात दुसऱ्या इको वाहनावर आदळली. ती इको वेगात असलेल्या लगतच्या कंटेनरला धडकली. अवजड कंटेनर वेगात असल्याने, दोन्ही इको वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. इकोमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना यात मार लागला. दोघे जण गंभीर जखमी झाले. तसेच अन्य एक वृद्ध महिलेला रुग्णवाहिका बोलावून उपचारासाठी राजगुरुनगर येथे नेण्यात आले.

या दरम्यान या मार्गावर नाशिक बाजूने येणारी वाहने थांबून राहिली. वाहन पुढे नेण्याच्या प्रकारामुळे घाटात वाहतूक कोंडी झाली. महामार्ग वाहतूक पोलीसांनी अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या साहाय्याने बाजुला केली. त्यानंतर जवळपास एक तासानंतर वाहतूक सुरळीत झाली.

## आंबेगाव पूर्वेत शेतकरी वळले केळी पिकाकडे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात बहुतांशी शेतकरी आता केळी पिकाकडे मोठ्या प्रमाणावर वळू लागले आहेत. रांजणी, नागापूर या गावांमध्ये केळीचे यशस्वी पिक शेतकऱ्यांनी घेतले. आता पारगाव मध्ये देखील केळीचे पीक प्रथमच शेतकऱ्यांनी घेण्यास सुरुवात केली आहे.



तालुक्याचा पूर्व भाग हा घोड, मीना या नद्यांमुळे बागायती बनला आहे. शेतीला बारमाही देखील पाणी असते. त्यामुळे शेतकरी शेतांमध्ये विविध प्रयोग करू लागले आहेत. गेले दोन वर्षांमध्ये बहुतांशी शेतकरी केळीच्या पिकाकडे वळाले आहेत. रांजणी गावात एक हजाराहून अधिक एकर क्षेत्रात शेतकऱ्यांनी केळीचे पिक घेतले आहे. केळीचे पिक दहा महीन्यातच निघते. बाहेरील देशांमधून केळी पिकाला अधिक मागणी आहे. केळीच्या निर्यातीतून शेतकऱ्यांना लाखो रुपये मिळतात. केळीला सातत्याने बाजारभाव देखील चांगला मिळतो. त्यामुळे शेतकऱ्यांचा कल आता केळी पिकाकडे वाढलेला दिसून येत आहे. तालुक्याच्या पूर्व भागातील पारगाव मध्ये आता नितीन दिनवर बढेकर या शेतकऱ्याने प्रथमच केळीची लागवड केली आहे. दीड एकर क्षेत्रात त्यांनी लागवड केली आहे.

# सासवड गोळीबार : आरोपी ताब्यात

**सासवड :** सासवड एसटी स्टॅण्ड समोरील श्रीशाज आईस्क्रीम पार्लर दुकानामध्ये ३ अज्ञात इसमांनी दि. १८ जुलै रोजी दुपारी ३.१५ वा.चे सुमारास राहुल नामदेव टिळेकर (वय ३८, रा. सासवड ) यांच्यावर गोळीचार केला होता. यातील फरार संशयित आरोपी परशुराम उर्फ परमा कामन्ना माने याला सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी यांच्या पथकाने अटक केली असल्याचे, पोलिसांनी सांगितले.



या बाबत जखमी राहुल नामदेव टिळेकर याचा भाऊ विजय नामदेव टिळेकर याने दिलेल्या तक्रारीवरून सासवड पोलीस ठाणे येथे ३ अज्ञात इसमांबरोबरच प्रताप जगताप, अजय जगताप, दयानंद जगताप यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गन्हयामध्ये आरोपी अजय संभाजी जगताप, दयानंद संभाजी जगताप, प्रताप संभाजी जगताप, सुजल तमन्ना आंबेभर, सुमित कमलाकर वाघमारे यांना अटक करण्यात आली होती. आरोपी सुजल तमन्ना आंबेकर (वय २०, रा. चंदन नगर, खुळेवस्ती, लुंकड कॅम्प, गल्ली नं. ३ खराडी) याच्याकडे गुन्हयात वापरलेले पिस्तुल तसेच जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली होती. यातील फरार आरोपी परशुराम उर्फ परमा कामन्ना माने हा छत्तीसगड येथुन उंड्री येथे आल्याची माहिती पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी यांना मिळाली. त्यांनी लागलीच सासवड पोलीस स्टेशनकडील डी.बी पथकाचे पोलीस हवालदार सुरज नांगरे, पोलीस हवालदार लियाकतअली मुजावर व पोलीस नाईक गणेश पोटे यांना साध्या वेशामध्ये पुणे उंड्री येथे रवाना केले. सदर अंमलदारांनी गोपनीय बातमीदाराचे मदतीने हांडेवाडी चौकामध्ये सापळा रचुन फरारी आरोपी परशुराम उर्फ परमा कामन्ना माने याला अटक केली.

आरोपीस सासवड न्यायालयाने ३ दिवसांची पोलीस कस्टडी सुनावली असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी पोलीस निरीक्षक सासवड पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

### मुली आणि महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या घटनांमध्ये होणारी वाढ चिंताजनक

# स्त्री-भ्रूण हत्येचे ज्वलंत वास्तव आणि त्याचे दुष्परिणाम

■ निखिल पाचारणे

**खेड :** ग्रंथ, पुराणात आणि कथा, कादंबरीत लक्ष्मीचे रूप धारण केलेल्या मुली आणि स्त्रियांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. पण हीच लक्ष्मी समाजात सुरक्षित वावरू शकत नसल्याचे गेल्या काही दशकांत घडु लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. उच्चभ्रु समाजात पूर्वापार चालत आलेल्या अवाढव्य लग्न खर्च आणि हुंडा या अनिष्ट प्रथा गेल्या चाळीस - पन्नास वर्षात सर्वसामान्य समाजात रूढ झाल्या. येथूनच मुलगी जन्माला घालणे हा शाप ठरू लागला. बडेजाव करीत मुलींची लग्न केल्यानंतर कर्ज बाजारी होऊन आत्महत्या वाढल्या. त्याचाही परिणाम मुलींच्या जन्माच्या आड येऊ लागला. वंशाला दिवा हवा पणती नको, म्हणुन कळी खुडली जाऊ लागली. या कळ्यांचे कमी झालेले प्रमाण आजच्या राक्षसी वृत्तीला जन्माला घालणारे ठरले आहे.

राजगुरुनगर येथील दोन अल्पवयीन मुलींच्या झालेल्या हत्येने पुन्हा एकदा मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशा घटनांमध्ये दुर्दैवाने वाढ झाली आहे. भारतात कोणताही भाग, समाज किंवा जात त्यातुन बाजूला नाही. उलट प्रगत राज्यात अशा घटना रोज घडत असल्याच्या बातम्या विविध माध्यमातून ऐकायला, पाहायला मिळतात. घटना घडल्या नंतर त्याची दाहकता त्या त्या भागात, प्रदेशात सामुहिक स्वरूपात आंदोलनाच्या माध्यमातून समोर येते. शासकिय यंत्रणा खडबडून जागी होते. पोलिस गुन्हा दाखल करून न्यायालयात



प्रकरण दाखल केले की दुसऱ्या घटनेच्या तपासला लागतात. ज्यांच्या बाबतीत हा प्रसंग घडला ते बऱ्याचदा जगाचा निरोप घेतात. ज्यांच्या कुटुंबात, नात्यात अशा घटना घडल्या ते घटक आयुष्यभर हे दुःख उराशी बाळगून 'केवळ' जगायचे म्हणुन जगतात. सामाजिक अर्थाने या घटनेचा परीणाम काही दिवस, काही महिने किंवा काही वर्षां पुरता राहतो. पुन्हा असे काही घडले की नागरिक पुन्हा धास्तावले जातात. मुली, महीला सुरक्षित नाहीत म्हणुन समाजव्यवस्था आणि कायदा, सुव्यवस्था राखण्याचे काम करणाऱ्या यंत्रणांना दोष देतात.

मुळात समस्येच्या मुळाशी जाऊन त्यावर उपाययोजना केल्या जात नाहीत. हे अत्याचारांच्या मालिकेचे मुख्य कारण आहे. परिणामांचा विचार न करणाऱ्या मुलांवर किंवा अत्याचारी पुरुष प्रवृत्तीवर कौटुंबिक आणि सामाजिक संस्कार कमी पडतात? असा कयास घटना घडल्यानंतर काढला जातो. तो सद्य स्थितीत बरोबर आहेच. याशिवाय कठोर कायदा आणि शिक्षा व अशा शिक्षेची भीती वाटावी अशी जनजागृती होणेही गरजेचे आहे. असे असले, तरी स्त्री भ्रूण हत्या हाही अत्याचार, स्त्रीचे व्यक्तिगत व सामाजिक शोषण आणि तीचे समाजातील स्थान खालावणाऱ्या घटनांचे मूळ आहे, हे नाकारता येणार नाही.

राज्याच्या आरोग्य विभागाच्या निर्देशांप्रमाणे पीसी, पीएनडीटी कायद्याच्या अहवालाला अनुसरून स्त्री , पुरुष प्रमाण १ हजारास ९५२ स्त्रिया असे असावे, अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. परंतु ० ते ६ वयोगटात मुलींच्या हत्येचे प्रमाण खूपच भयंकर व धक्कादायक असल्याचे लक्षात येते. सन २०११ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण १ हजाराला ८८३ असे आहे. म्हणजेच महाराष्ट्र राज्यातच गेल्या दहा वर्षात अंदाजे तब्बल ४ लक्ष ६८ हजार ६८० एवढ्या मोठ्या प्रमाणात स्त्री भृणांची हत्या करण्यात आलेली आहे.

मुली जन्माला येऊन त्यांचे संगोपन,शिक्षण, लग्न यावरील खर्चासह अनेक जबाबदाऱ्या घेणारी समाजव्यवस्था निर्माण होणे गरजेचे आहे. त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांच्या घटनांमध्ये घट व्हावी किंवा अशा घटनांचा बीमोड व्हावा यासाठी कठोर कायदा आणि शिक्षा समाजातील प्रत्येक घटकाला माहिती होईल, अशा स्वरूपात अंमलात आणण्यासाठी प्रयत्न होणे अपरिहार्य आहे.

### गर्भपातांची चिंताजनक संख्या

- भारत देशात दरवर्षी जवळपास ४ कोटी ८५ लक्ष एवढ्या प्रसूती होत असतात. सन २०१५ पासून २०१९ अखेर २ कोटी ५ लक्ष प्रसूती या अनियोजित किंवा कोणत्याही पूर्वतयारी शिवाय झालेल्या आहेत. यापैकी १ कोटी ६६ लक्ष एवढ्या मोठ्या संख्येने गर्भपात झालेले आहेत किंवा केलेले आहेत.

### राज्यातील संख्या अधिक

- सन १९७१ मध्ये महाराष्ट्राचे महाराष्ट्रामध्ये प्रसूती विषयक कायदा एम टी पी लागू झाला. या कायद्याने काही विशिष्ट परिस्थितीत काही अटींवर आधारित व काही अपरिहार्य कारणांसाठी प्रसुती दरम्यान गर्भपात करण्यास परवानगी घेता येऊ लागली. यानंतर संपूर्ण देशातील गर्भपातांपैकी सर्वाधिक गर्भपात महाराष्ट्र राज्यात झाल्याची धक्कादायक माहिती समोर आलेली आहे. तशी नोंद भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने राज्यसभेत सादर केलेल्या अहवालातच नमूद केलेली आहे. देशातील सर्वाधिक म्हणजेच पहिल्या क्रमांकाची गर्भपात आकडेवारी महाराष्ट्राची असून दुसऱ्या क्रमांकावर तामिळनाडू तर तिसऱ्या क्रमांकावर पश्चिम बंगाल हे राज्य आहे.

# अस्मिता

## ठुमका लगाके...

फिटनेस फंडा

ढिनचॅक गाण्यांवर नाचायला प्रत्येकालाच आवडतं. ठेक्याच्या गाण्यांवर आपले पाय आपोआपच थिरकू लागतात. त्यातंच ते एखादं ट्रेंडी धम्माल हिंदी गाणं असेल तर बघायलाच नको. आपण बॉलिवूड डान्स आवड म्हणून शिकत असलो तरी फिटनेसच्या दृष्टीनंही त्याचे अनेक फायदे आहेत. म्हणूनच बॉलिवूडच्या गाण्यांवर थिरकण्याचं प्रमाण जगभरातच वाढलंय. टाकू या एक नजर बॉलिवूड डान्समुळे होणाऱ्या फायद्यांवर...

* बॉलिवूड डान्समध्ये संगीताच्या तालावर लयबद्ध हालचाली कराव्या लागतात. सुरूवातीला आपण चुकतो. पण पुरेशा सरावानंतर आपल्या शरीराच्या हालचाली ठेक्यानुसार होऊ लागतात. यामुळे आपल्या शरीरात उपजत असलेली समतोल साधण्याची आणि समन्वयाची क्षमता वाढीस लागते.

* बॉलिवूड डान्स करताना प्रचंड उर्जेची गरज लागते. त्यामुळे हा नृत्यप्रकार एक उत्तम एरोबिक्स व्यायाम आहे. म्हणूनच नाचल्यावर आपल्या शरीराला ऑक्सिजनचा भरपूर प्रमाणात पुरवठा होतो.

* हिंदी गाण्यांचं संगीत सुमधूर असतं. गाणी ऐकल्यावर आपले कान तृप्त होतात आणि मन आनंदी होतं. बॉलिवूड संगीतावर थिरकल्यानंतर आपण प्रचंड दमतो. पण या नृत्यातून आपल्याला एक निराळा आनंद मिळतो. बेभान होऊन नाचताना आपण सगळी दु:ख,चिंता विसरतो. म्हणूनच बॉलिवूड संगीताच्या ठेक्यावर थिरकणं हा ताणतणावापासून मुक्ती मिळवण्याचा उत्तम मार्ग आहे.

* बॉलिवूड डान्स करताना होणाऱ्या लयबद्ध हालचालींमुळे संपूर्ण शरीराची चपळता वाढते. डान्समुळे आपल्या सांध्यांना नैसर्गिक वंगण घातलं जातं. त्यामुळे सांधिवाताचा धोका कमी होतो.





* बॉलिवूड डान्स हा सुद्धा व्यायामाचाच एक प्रकार आहे. त्यामुळे यात सातत्य राखणं गरजेचं आहे. एकदा डान्स यायला लागला की शिकणं सोडून दिलं असं होता कामा नये. तुम्ही फक्त मनोरंजनासाठी नाही तर आरोग्यासाठीही नृत्य करताय हे कायम लक्षात ठेवा. संगीताच्या तालावर अगदी बिनधास्त ठेका धरा आणि उत्तम आरोग्याचे लाभ मिळवा.

## 'लेडी सिंघम'

मानिनी

**आयएएस अधिकारी मुग्धा सिन्हा यांना 'लेडी सिंघम' म्हणणं वावगं ठरू नये. वाळू माफिया, भू माफिया, खाण माफिया यांच्या विरोधात त्या उभ्या ठाकल्या. आपण सर्वसामान्य जनतेचे सेवक आहोत, त्यामुळे सेवाभावी वृत्तीने काम करायला हवं असं त्या मानतात. अत्यंत धडाडीच्या या आयएएस अधिकाऱ्याची ही ओळख...**

मुग्धा सिन्हा... अत्यंत धडाडीच्या आयएएस अधिकारी. एखाद्या चित्रपटात शोभेल अशीच त्यांनी कहाणी आहे. विविध माफियांच्या विरोधात त्यांनी दंड थोपटले. सर्वसामान्य जनतेच्या आधारस्तंभ ठरल्या. २०१० पर्यंत राजस्थानमधल्या झुंझुनू जिल्ह्याची जबाबदारी कोणत्याही महिला जिल्हाधिकाऱ्याकडे सोपवण्यात आली नव्हती. मुग्धा इथल्या पहिल्याच महिला जिल्हाधिकारी. १९९९ च्या बॅचच्या आयएएस अधिकारी असलेल्या मुग्धा यांनी झुंझुनूच्या आधी साधारण ३० ते ४० लाख लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यांची जबाबदारी सांभाळली होती. त्यामुळे या तुलनेने छोट्या जिल्ह्याची जबाबदारी सांभाळणं फारसं कठीण नसेल असं त्यांना वाटलं. पण इथल्या आव्हानांची त्यांना अजिबात कल्पना नव्हती. मुग्धा यांच्या धडाडीमुळे अवघ्या सहा महिन्यांमध्येच त्यांची इथून बदली झाली. पण त्या आधी त्यांनी बरंच काम करून ठेवलं होतं.

अरवली पर्वतरांगांमध्ये सुरू असलेल्या अवैध खाणकामासाठी नेल्या जाणाऱ्या स्फोटकांचा मोठा साठा त्यांनी जप्त केला. वाळू आणि दारूमाफियांच्या विरोधात त्या ठामपणे उभ्या राहिल्या.



कोणत्याही धमक्या, दबावाला त्या बळी पडल्या नाहीत. बेकायदेशीर रस्तेबांधणीला प्रतिबंध केला. गॅस सिलेंडरच्या अवैध पुरवठ्याला आळा घातला. त्यांच्या कामांची ही यादी खूप मोठी आहे. राजकारणी, मोठे नेते यांचा ताण त्यांनी घेतला नाही. इथल्याच एका अवैध खाणीत कामगारांचा मृत्यू झाल्यानंतर ती कायमची बंद करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. २०१० मध्ये बंद झालेली ही खाण पुन्हा सुरू झाली नाही.

मुग्धा यांचे वडिल गुरस्वरूप सिन्हा भारतीय हवाई दलात पायलट होते. मुग्धा अवघ्या चार वर्षांच्या असताना १९७८ मध्ये लडाखमधल्या विमान अपघातात त्यांचा मृत्यू झाला. वडिलांनंतर आईने मुग्धा आणि त्यांच्या दोन बहिणींना सांभाळलं. प्रशासकीय अधिकारी बनण्याच्या दृष्टीनेच त्यांची जडणघडण झाली. आपल्या मुलींनी वडिलांप्रमाणे देशाची सेवा करावी, हे स्वप्न त्यांच्या आईने पाहिलं आणि ते मुलींच्या डोळ्यात उतरवलं. पदवी परीक्षेत त्या दिल्ली विद्यापीठातून तिसऱ्या आल्या. त्यांना भारतीय परदेश सेवेत जायचं होतं. पण आईमुळे त्या आयएएसकडे वळल्या. दुसऱ्या प्रयत्नात त्या यशस्वी झाल्या. आयएएस परीक्षेत संपूर्ण भारतातून त्यांना आठवी रँक मिळाली. आपल्या कामाला त्या नोकरी नाही तर सेवा मानतात. सेवाभावी वृत्तीने काम करतात. सर्वसामान्य माणसासाठी केलेलं काम कधीच वाया जात नाही. त्याची गोड फळं तुम्हाला मिळतातच, असं मुग्धा सांगतात. विभाग कुठलाही असला तरी गैरप्रकारांविरोधात उभं ठाकण्याच्या वृत्तीमुळे त्यांना 'लेडी सिंघम' म्हणणं वावगं ठरणार नाही.

## विस्तारा ब्लॉगचं विश्व

स्कील डेव्हलपमेंट

स्वत:चा ब्लॉग असणं हे प्रतिष्ठेचं लक्षण मानलं जातं. ब्लॉगिंग फक्त वेळ घालवण्याचं साधन उरलेलं नाही. तर या माध्यमातून तुम्ही उत्पन्न मिळवू शकता. विविध विषयांवरचं लिखाण ब्लॉगवर प्रकाशित करू शकता. ब्लॉगर हा एक व्यावसायिक असतो. अर्थात ब्लॉगिंगच्या माध्यमातून पैसा कमावणं सोपं नसतं. यासाठी धैर्याची गरज असते. ब्लॉग सुरू केल्यावर पैशांचा धो धो पाऊस पडायला सुरूवात होते, असाही समज असतो. पण प्रत्यक्षात सुरूवातीचा काही काळ फक्त ब्लॉगिंगवर तुमचं घर चालू शकत नाही. काही ब्लॉगर्स तीन महिन्यांनंतर जम बसवतात तर काहींना वर्ष–दोन वर्षंही लागू शकतात. वेळ, पैसा आणि प्रयत्न यांच्या गुंतवणुकीच्या बळावर ब्लॉगर्स चांगलं उत्पन्न मिळवू शकतात. तुम्हीही ब्लॉग रायटिंगच्या विचारात असाल तर त्यातून चांगलं उत्पन्न कसं मिळवायचं याबाबतच्या काही टिप्स...

* दीर्घकाळाचा विचार करून ब्लॉगिंगकडे वळणार असाल तर स्वत:चा ब्लॉग तयार करा. इतरांच्या ब्लॉगवर लिखाण करत राहिल्याने तुम्हाला चांगलं उत्पन्न मिळवता येणार नाही. ब्लॉग सुरू करण्यासाठी 'टेक फ्रेंडली' असण्याची गरज नाही. ब्लॉग सुरू करण्याचं मार्गदर्शन ऑनलाईन मिळू शकतं. आर्थिक, भावनिक आणि वेळेची गुंतवणूक स्वत:च्या ब्लॉगमध्ये करा. तुमचा ब्लॉग सुरू करायला मदत करणारी बरीच व्यासपीठं आहेत.



* नियमित उत्पन्न मिळवण्यासाठी ब्लॉगवर चांगला मजकूर प्रकाशित करायला हवा. यासाठी पुरेसा वेळ देणं गरजेचं आहे. तुमचं म्हणणं लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचायला हवं. ब्लॉगला भेट देणाऱ्यांचं तिथे स्वागत व्हायला हवं. त्यामुळे ब्लॉगच्या डिझाइनवर भर द्या.

* वाचकांमध्ये लोकप्रिय असणाऱ्या ब्लॉग्जवरही लिखाण करा. तुमचं नाव वाचकांपर्यंत पोहोचायला हवं. तुमच्या विषयाला अनुसरून ब्लॉग्जची निवड करा.

* अॅड नेटवर्कच्या माध्यमातून ब्लॉगवरच्या जाहिराती सादर करा. 'गुगल अॅडसेन्स', 'चितिका', 'इन्फोलिंक', 'मीडिया डॉट नेट', 'पॉप अॅड्स' अशी अॅड नेटवर्क तुमच्या कामी येतील.

* ब्लॉगच्या प्रसिद्धीसाठी सोशल मीडियाचाही वापर करा. फेसबुकवर बरेच ब्लॉग्ज शेअर होत असतात. दिवसातला काही वेळ सोशल मीडियासाठी द्या. तुमचं लिखाण शेअर करा. व्हॉट्स अॅप ग्रुप्सवरही तुमचं लिखाण पाठवा. यामुळे तुमचा वाचक वर्ग वाढायला मदत होईल.

### हेअर केअर

#### केसांच्या झटपट वाढीसाठी...

केसांच्या वाढीसाठी बरेच प्रयत्न केले जातात. पण वाढतं प्रदूषण, उत्पादनांमधली घातक रसायनं यामुळे केस वाढण्याऐवजी गळू लागतात. केस झटपट वाढवण्यासाठी अगदी सोपा उपाय करता येईल. यासाठी कांदा, खोबरेल तेल आणि अॅलोव्हेरा घ्या. कांदा किसून त्याचा रस काढा. अॅलोव्हेराचे तुकडे खोबरेल तेलात नीट उकळून घ्या. हे मिश्रण थंड होऊ द्या. एका स्प्रे बॉटलमध्ये अॅलोव्हेरा आणि खोबरेल तेलाचं मिश्रण गाळा. त्यात कांद्याचा रस घाला. हे मिश्रण केसांवर फवारा. मसाज करा. ४० मिनिटांनी शँपूने केस धुवा. या उपायाने साधारण महिन्याभरात केस वाढू लागतील.



### स्मार्ट टिप्स

#### फुगीर गाल हवे आहेत?

चाफेकळी नाक, काळ्याभोर डोळ्यांसह फुगीर गाल चेहऱ्याच्या सौंदर्यात भर घालतात. पण अनेक कारणांमुळे गाल चपटे दिसू लागतात. वाढतं वय, पोषक घटकांची कमतरता अशी अनेक कारणं यामागे असतात. गाल फुगीर दिसावेत यासाठी रात्रभर भिजवलेल्या मेथीदाण्यांची पेस्ट करून चेहऱ्याला लावा. वाळल्यावर धुवून टाका. गालांवर दररोज राईच्या तेलाने मसाज करा. बदामाचं तेलही वापरता येईल. ग्लिसरिन आणि गुलाब पाणी एकत्र करून या मिश्रणाने गालांवर मसाज करा.



### हेल्दी लाईफ

#### भिजवून खाल्ल्याने...

काही पदार्थ भिजवून खाल्ल्याने पोषणमूल्यं वाढतात.
भिजवलेल्या जिऱ्यातून शरीराला पोटॅशियम मिळतं. जिऱ्याचं पाणी लोहाचा मुख्य स्रोत आहे.
भिजवलेल्या मेथीदाण्यांच्या सेवनाने दात आणि हाडं बळकट होतात.
रक्ताभिसरण सुधारण्यासाठी भिजवलेल्या मनुका खा.
भिजवलेली खसखसही लाभदायी ठरते. मूत्रमार्गाशी संबंधित समस्या असतील तर भिजवलेली बडिशेप खा.



## लज्जतदार फणस बिर्याणी

रसगंधा

मैत्रिणींनो, बिर्याणीचे विविध प्रकार पहायला मिळतात. मांसाहारी खवय्ये चिकन बिर्याणीवर ताव मारतात. शाकाहारींना व्हेज बिर्याणी, हंडी बिर्याणीवर समाधान मानावं लागतं. तुम्हीही घरी बिर्याणी बनवत असाल. बाजारात फणसही मिळतो. तुम्ही कच्च्या फणसाची चविष्ट बिर्याणी बनवू शकता.

**साहित्य:** २०० ग्रॅम बासमती तांदूळ, १०० ग्रॅम कच्चा फणस, तीन कांदे, एक टी स्पून लसूण पेस्ट, एक टी स्पून आल्याचे लांब आणि पातळ तुकडे, दोन मोठ्या वेलची, एक छोटा चमचा जिरं, चार लवंगा, जावित्रीचे दोन तुकडे, दोन मोठे चमचे तूप, चमचाभर गरम मसाला, दहा रोस्टेड काजू, तेल, बारीक चिरलेली कोथिंबिर, चवीनुसार मीठ




**कृती**: फणसाचे एक इंच आकाराचे चौकोनी छोटे तुकडे करून घ्या. दोन कांद्यांचे लांब आणि बारीक काप करा. एक कांदा बारीक चिरून घ्या. कढईत तेल गरम करून फणसाचे तुकडे तळून घ्या. बाजूला काढून ठेवा. उरलेल्या तेलात कांद्याचे पातळ काप सोनेरी रंगावर तळा. कुकरमध्ये तूप गरम करून त्यात जिरं, खडे मसाले आणि लसणाची पेस्ट घालून परतून घ्या. यात बारीक चिरलेला कांदा घाला. सोनेरी रंगाचा होईपर्यंत परता. आल्याचे तुकडे घालून पाच ते सात सेकंद परता. यानंतर यात तांदूळ, मीठ, गरम मसाला आणि पाणी घालून एक शिटी करा. कुकरमधली वाफ निघून गेल्यावर तो उघडा. त्यावर तळलेला फणस आणि कांदा घाला. कुकर थोडा वेळ झाकून ठेवा. बिर्याणी थोडी थंड झाल्यावर वरून काजू आणि कोथिंबिर घालून खायला द्या.

## नात्यात प्रेम नाही...

समुपदेशन

माझ्या लग्नाला सहा वर्षं झाली आहेत. आम्हाला मूल नाही. आमचं लग्न पालकांनी ठरवलं. पण लग्नानंतर आमच्यात कोणतेही भावनिक बंध जुळले नाहीत. अनेक प्रयत्न करूनही आम्ही एकमेकांच्या प्रेमात पडू शकलो नाही. आम्ही दोघंही आधुनिक विचारांचे असून यशस्वी कारकिर्द घडवत आहोत. आमच्या नात्यात प्रेमच नाही. त्यामुळे समाज काय म्हणेल हा विचार बाजूला सारून मी या नात्यातून बाहेर पडू का? यानंतर मी आनंदी राहू शकेन का?

– या नात्यात रहायचं किंवा नाही याचा निर्णय सर्वस्वी तुझा असेल. हे आयुष्य तुझं आहे. त्यामुळे इतर कोणीही तुझ्या वतीने निर्णय घेऊ शकणार नाही. मला वाटतं, तू तुझे प्राधान्यक्रम ठरव. आयुष्यात काय हवं आहे, याचा विचार कर. घटस्फोटाचा निर्णय घेण्याआधी तू विवाह समुपदेशकाची मदत घे. कुटुंब, मित्रमैत्रिणी, नातेवाईक यांचा किती विचार करायचा हे तुझ्यावर अवलंबून आहे. तुला काय महत्त्वाचं वाटतं याचा विचार कर. हे नातं टिकवणं किंवा संपवणं या दोन्ही निर्णयांनंतर तुला आव्हानांना समोरं जावं लागेल. प्रत्येक निर्णयाचे चांगले आणि वाईट परिणाम असतात. पण तुझा आनंद महत्त्वाचा. तुझे प्राधान्यक्रम ठरवून लघु आणि दीर्घकालीन वैयक्तिक उद्दिष्ट ठरव. तुझ्या भावना, मतं, पतीकडे व्यक्त कर. दोघांनी एकत्रितपणे योग्य तो निर्णय घ्या.




## फॉर परफेक्ट कुर्ता लूक

स्टाईल स्टेटमेंट

कुर्ता हा आरामदायी पेहराव कोणत्याही ऑकेजनलाकॅरी करता येतो. यासोबत वेगवेगळे बॉटम्स ट्राय करता येतात. जीन्स, लेगिंग्ज, पलाझो, पँट यापैकी कशावरही कुर्ता मॅच करता येतो. अगदी स्कर्टवरही तुम्ही कुर्ता घालू शकता. म्हणूनच कंफर्टसाठी बॉलिवूड दिवाज कुर्त्याला पसंती देत आहेत. तुम्हीही स्टायलिश आणि कंफर्टेबल लूकसाठी या दिवाजकडून प्रेरणा घेऊ शकता.

* आदिती रावने फ्लेअर्ड स्कर्टवर स्लीव्हलेस कुर्ता कॅरी केला होता. पांढऱ्या रंगाचा कुर्ता आणि स्कर्टवर निळ्या ब्लॉक प्रिंट्स शोभून दिसत होत्या. त्यावर तिने नेव्ही ब्लू दुपट्टा घेतला होता. सिल्व्हर ज्वेलरीने हा लूक खुलवला होता. हा देसी लूक तुम्ही कधीही कॅरी करू शकता.



* करिश्मा कपूरही मध्यंतरी समर लूकमध्ये दिसली. तिने नॅचरल ब्लॉक प्रिंटचा स्ट्राईपवाला कुर्ता घातला होता. त्याच डिझाइनची बॉटम कॅरी केली होती. त्यावर फ्लॅट चप्पल छान दिसत होत्या. कॅज्युअल ऑकेजनला असा पेहराव करता येईल. उन्हाळ्यात शरारा हा प्रकार बाजूला ठेवला जातो. पण तारा सुतारियाने नूडल स्ट्रॅप शॉर्ट व्हाईट कुर्त्यासोबत प्रिंटेड शरारा कॅरी केला होता. त्यावर साजेसा दुपट्टा या पेहरावाची शान अधिकच वाढवत होता.

* मोकळ्या ढाकळ्या कुर्त्यांच्या चाहत्या असाल तर दीया मिर्झाप्रमाणे तयार व्हा. तिने ग्रे रंगाचा कुर्ता मस्टर्ड रंगाच्या स्ट्रेट लेग्ड ट्राउझरवर कॅरी केला होता. ग्रे आणि मस्टर्ड हे कॉम्बिनेशन चांगलंच उठून दिसलं.


## बेस्ट कॉम्बिनेशन्स

डाएट मंत्रा

आहारामध्ये वैविध्य असावं असं तज्ज्ञ सांगतात. आपल्यालाही हे वैविध्य अपेक्षित असतं. यामुळे रुचिपालट होतो. विविध घटकांमध्ये पौष्टिक तत्त्वांचा लाभ होतो आणि निरोगी रहाणं शक्य होतं. आपल्या आहारातच औषध दडलंय असं म्हणतात. यात तथ्यही आहे. मुख्य म्हणजे काही पदार्थांचं मिश्रण अधिक लाभदायक ठरतं. या प्रत्येक पदार्थामध्ये काही महत्त्वपूर्ण औषधी आणि अनुकूल तत्त्व असतातच. ते एकत्र येतात तेव्हा ही अनुकूलता द्विगुणीत होते. म्हणूनच हे पदार्थ अधिक आरोग्यदायी सिद्ध होतात. आज अशीच काही मिश्रणं पाहू. आहारामध्ये वैविध्य असावं असं तज्ज्ञ सांगतात. आपल्यालाही हे वैविध्य अपेक्षित असतं. मुख्य म्हणजे काही पदार्थांचं मिश्रण लाभदायक ठरतं. या प्रत्येक पदार्थामध्ये काही महत्त्वपूर्ण औषधी आणि अनुकूल तत्त्व असतातच. ते एकत्र येतात तेव्हा ही अनुकूलता द्विगुणीत होते.



* ब्रोकली आणि टोमॅटो हे सॅलडमधील महत्त्वपूर्ण घटक आहेत. टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन सी, ई, ए आणि बी ची पर्याप्त मात्रा असते तर ब्रोकलीमध्ये व्हिटॅमिन के, फोलेट आणि अॅन्टी कॅन्सर तत्त्व असतात. या दोघांचं मिश्रण एकूण गुण मात्रेत पन्नास टक्के वाढ करतं आणि त्याचे शरीराला थेट लाभ मिळतात.



* प्रत्येकालाच सफरचंद आवडतं त्याचप्रमाणे डार्क चॉकलेटही सर्वांनाच प्रिय असतं. या दोहोंचं एकत्रित सेवन शरीराला अत्यंत उपकारक ठरतं. सफरचंद आणि डार्क चॉकलेट एकत्र खाल्ल्यास हृदय तंदुरुस्त राहतं आणि हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता कमी होते.

* आपण खनिजांनी परिपूर्ण असणारे काळे वाटाणे उसळ स्वरुपात घेतो. उकडून तिखट मीठ घालूनही हे वाटाणे खाल्ले जातात. पण ते लाल ढोबळी मिरचीसवे खाल्ल्यास अधिक लाभ मिळतो. लाल ढोबळी मिरचीमध्ये लोहाचं प्रमाण भरपूर असतं. यामुळे शरीरातील लोहाची कमतरता भरून निघण्यास मदत होते. काळे वाटाणे लाल ढोबळी मिरचीच्यासवे खाल्ल्यानं शरीरात लोहाचं उत्तमरित्या शोषण होतं. यामुळे लोहाची जवळपास सहा टक्के अतिरिक्त मात्रा शरीराला मिळते.

* पापलेट हा मासा चवीसाठी प्रसिद्ध आहे. या माशामध्ये ओमेगा–३ फॅटी अॅसिड पर्याप्त प्रमाणात असतं. हा माशापासून डिश बनवताना लसणाचा वापर केल्यास उपयोग्यता अनेक पटीनं वाढते. लसणामुळे शरीराला यातील लाभ सुकर पद्धतीनं प्राप्त होतात.

## देशोदेशींची ब्युटी सिक्रेट्स

ब्युटी टॉक

चेहऱ्याचं सौंदर्य खुलवण्यासाठी विविध नैसर्गिक घटक आजमावले जातात. भारतात अशा नैसर्गिक घटकांची कमतरता नाही. अॅलोव्हेरापासून गुलाबपाण्यापर्यंत अनेक देशी पर्याय कोणत्याही दुष्परिणामांशिवाय त्वचेची देखभाल करू शकतात. आपणही कोणतीही शंका मनात न आणता त्यांचा वापर करतो. भारताप्रमाणेच जगभरातल्या महिला त्वचेच्या नैसर्गिक देखभालीवर भर देतात. देशोदेशीच्या महिलांच्या सौंदर्याची काही गुपितं जाणून घेतल्यास सोपे उपाय सहज तपासून पाहता येतील.

* ग्रीसमध्ये प्राचीन संस्कृतीच्या खुणा पहायला मिळतात. पुराणकाळातल्या ग्रीक देवता सौंदर्य खुलवण्यासाठी ऑलिव्ह ऑईलचा वापर करायच्या. म्हणूनच या देशातल्या महिलाही त्वचेला ऑलिव्ह ऑईलचं पोषण देतात. अँटीऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वांनी समृद्ध असं ऑलिव्ह ऑईल त्वचेला तजेला देतं. याच्या नियमित वापरामुळे चेहऱ्यावरच्या सुरकुत्या कमी होतात तसंच सूर्यकिरणांमुळे होणारं नुकसान टाळता येतं.



* शेजारी चीनमधल्या महिला चेहऱ्याच्या देखभालीसाठी तांदूळ भिजवलेलं पाणी वापरतात. तांदळाचं पाणी त्यांच्या सौंदर्यसाधनेचा एक भाग असतं. या पाण्याचा वापर चेहरा स्वच्छ करण्यासाठी केला जातो. अगदी सरळ सोपा असा हा उपाय तुम्हीही करू शकता. या पाण्यात अँटीऑक्सिडंट्स असतात. यामुळे त्वचेचं पोषण होतं तसंच फ्री रॅडिकल्सची तीव्रता कमी होऊन त्वचा तजेलदार दिसते. तांदूळ पाण्यात अर्धा तास भिजवून ठेवा. पाणी गाळून घ्या. या पाण्याने चेहरा धुवून घ्या.

* जपानमध्ये 'सेक' नावाची राईस वाईन मिळते. तांदळापासून बनवलेल्या या वाईनचे बाथ या देशात बरेच लोकप्रिय आहेत. सेकमधलं 'कॉजिक अॅसिड' नैसर्गिक पद्धतीने त्वचा एक्सफोलाइट करतं. यामुळे चेहऱ्यावरचे काळे डाग कमी होतात.

* अॅव्होकॅडो हे फळ भारतातही लोकप्रिय होत आहे. सिंगापूरमध्ये त्वचेच्या पोषणासाठी या फळाचा गर वापरतात. इथल्या महिला अॅव्होकॅडोचा गर कुस्करून चेहऱ्याला लावतात. यामुळे त्वचेतला ओलावा टिकून राहतो. अॅव्होकॅडोमध्ये फॅटी अॅसिड्स, ई जीवनसत्त्व, पोटॅशियम, लेसिथिनसारखे पोषक घटक असतात. यामुळे त्वचेचं सौंदर्य खुलतं.

* प्राचीन काळातली इजिप्तची अखेरची राणी क्लिओपात्रा आपलं सौंदर्य जपण्यासाठी दूध आणि मधाने आंघोळ करत असे. इजिप्तमधल्या महिला या दोन घटकांचा नियमित वापर करून त्वचेचा तजेला टिकवून ठेवतात.

## At a Glance

### खोऱ्यातील थंडीचा कडाका वाढला

**श्रीनगर :** काश्मीर खोऱ्यात काही काळ विश्रांती घेतल्यानंतर थंडीचा कडाका वाढल्याने रात्रीचे तापमान गोठण्याच्या बिंदूच्या खाली स्थिरावले आहे. आकाश निरभ्र असल्याने रात्रीचे तापमान गोठवण्याच्या बिंदूच्या खाली आल्याची माहिती हवामान खात्याने दिली. श्रीनगरमध्ये किमान तापमान उणे १ अंश सेल्सिअस नोंदले गेले, जे आदल्या रात्रीच्या ०.९ अंशांच्या तुलनेत कमी आहे.

### हत्ती पिसाळल्याने २३ जण जखमी

**मलप्पुरम (केरळ) :** तिरुरजवळील एका मशिदीत एका धार्मिक समारंभादरम्यान एक हत्ती पिसाळल्याने २३ जण जखमी झाले. जखमींपैकी एकाला हत्तीने उचलून फेकून दिले, अशी माहिती पोलिसांनी दिली. रात्री साडेबाराच्या सुमारास हत्तीच्या हल्ल्यानंतर घाबरलेल्या लोकांनी केलेल्या चेंगराचेंगरीत उर्वरित २२ जण किरकोळ जखमी झाले.

### २५ दिवस लाईट नाही

**बुडौं (उत्तर प्रदेश) :** २५० केव्हीए वीज ट्रान्सफॉर्मर चोरीला गेल्याने सोराहा येथील ग्रामस्थ सुमारे महिनाभरापासून विजेशिवाय जगत आहेत. उघैती परिसरातील गावातील ट्रान्सफॉर्मर चोरट्यांनी तोडून त्यातील तारा चोरल्या होत्या. वीज विभागाने या प्रकरणाची चौकशी सुरू केली असली तरी २५ दिवस उलटूनही अद्याप नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आलेला नाही.

# कटरा-बनिहाल दरम्यान रेल्वे धावली

## हायस्पीड ट्रेनची चाचणी यशस्वी, रेल्वेच्या इतिहासातील नवा अध्याय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील कटरा ते बनिहाल या भौगोलिकदृष्ट्या आव्हानात्मक मार्गावर हायस्पीड ट्रेनची यशस्वी चाचणी घेऊन भारतीय रेल्वेच्या इतिहासात एका नव्या अध्यायाची भर पडली आहे. उत्तर परिमंडळाचे रेल्वे सुरक्षा आयुक्त दिनेशचंद देशवाल यांनी बुधवारी ही माहिती दिली. काश्मीर आणि देशाच्या उर्वरित भागांदरम्यान थेट रेल्वे सेवा लवकर सुरू होण्यासाठी देशवाल यांच्या वक्तव्याकडे सकारात्मक संकेत म्हणून पाहिले जात आहे. मात्र, प्रवाशांना आणखी थोडी वाट पाहावी लागणार आहे. दोन दिवसांची वैधानिक पाहणी पूर्ण झाल्यानंतर गोळा करण्यात आलेल्या आकडेवारीचे विश्लेषण करण्यात येणार असून, त्यानंतर बहुप्रतीक्षित रेल्वे सेवा सुरू करण्याबाबत केंद्र निर्णय घेईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

कटरा रेल्वे स्थानकातून ही हायस्पीड ट्रेन यशस्वीरित्या उड्डाण करून बनिहालला पोहोचल्यानंतर पत्रकारांशी बोलताना देसवाल म्हणाले की, त्यांची टीम कटरा येथे परत येईल आणि काश्मीरसाठी थेट रेल्वे सेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी गोळा केलेल्या सर्व डेटाचे विश्लेषण केले जाईल. भौगोलिकदृष्ट्या आव्हानात्मक परिस्थितीत कटरा ते बनिहाल ११० किमी प्रतितास वेगाने धावत्या ट्रॅकवर रेल्वेची यशस्वी चाचणी घेण्यात आल्याने रेल्वेच्या इतिहासात एका नव्या अध्यायाची भर पडली आहे. परीक्षा सुरळीत पार पडली. त्यावर आम्ही पूर्णपणे समाधानी आहोत. याचे श्रेय आमच्या अभियंत्यांना जाते, असेही ते म्हणाले.

सीआरएसनुसार, चाचणी ट्रेन सकाळी १०.३० वाजता कटरा स्टेशनवरून निघाली आणि दीड तासात बनिहाल स्टेशनवर पोहोचली. ट्रेनने दुपारी २ वाजता कटरा येथे परतीचा प्रवास सुरू केला आणि सीआरएसच्या मते, या ट्रॅकवर ही शेवटची चाचणी आहे. नव्याने बांधलेल्या रेल्वे मार्गाच्या दोन दिवसीय वैधानिक तपासणीसाठी कटरा येथे पोहोचलेले देशवाल म्हणाले की, काश्मीर आणि उर्वरित देशादरम्यान रेल्वे सेवा सुरू करण्याबाबत केंद्र सरकार अंतिम निर्णय घेईल.

कटरा-बनिहाल विभागावर आतापर्यंतची तपासणी आणि चाचणी समाधानकारक असून, रेल्वेने ऐतिहासिक असे काम केले असल्याचे मानले जाते.

**सहा चाचण्या यशस्वी**

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी गेल्या महिन्यात रियासी-कटरा सेक्शन पूर्ण करण्याची घोषणा केली होती, ज्याला जवळपास तीन दशकांच्या कामानंतर काश्मीरला उर्वरित देशाशी जोडण्यासाठी एक महत्त्वपूर्ण विकास म्हणून पाहिले जात होते. ४ जानेवारी रोजी कटरा-बनिहाल सेक्शनवर इलेक्ट्रिक ट्रेनची यशस्वी चाचणी घेण्यात आली. रेल्वेने गेल्या महिन्यात मार्गाच्या विविध भागांवर सहा चाचण्या घेतल्या आहेत, ज्यात अंजी खड्डा आणि चिनाब ब्रिज या दोन प्रमुख थांब्यांचा समावेश आहे.

**काश्मीरला जोडणारा प्रकल्प**

उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक (यूएसबीआरएल) या एकूण २७२ किलोमीटर लांबीच्या प्रकल्पापैकी २०९ किमीच्या विविध टप्प्यांवर चाचण्या घेण्यात आल्या आहेत. काश्मीरला देशाच्या उर्वरित भागाशी रेल्वेने जोडण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प १९९७ मध्ये सुरू करण्यात आला होता, परंतु भूवैज्ञानिक, भौगोलिक आणि हवामानविषयक आव्हानांमुळे अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागले.

# शारीरिक टिप्पणी हा लैंगिक छळ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केरळ उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, एखाद्या महिलेच्या शारीरिक स्वरूपावर टिप्पणी करणे हा लैंगिक छळाअंतर्गत दंडनीय गुन्हा ठरेल. केरळ राज्य वीज मंडळाच्या (केएसईबी) एका माजी कर्मचाऱ्याने यासंदर्भात दाखल केलेली याचिका फेटाळताना न्यायमूर्ती ए. बदरुद्दीन यांनी हा निकाल दिला. याच संस्थेच्या एका महिला कर्मचाऱ्याने आपल्याविरोधात दाखल केलेला लैंगिक छळाचा गुन्हा रद्द करण्याची मागणी आरोपीने याचिकेत केली होती.

आरोपी २०१३ पासून पिडितेविरोधात अपशब्द वापरत होता आणि त्यानंतर २०१६-१७ मध्ये अपशब्द आणि व्हॉईस कॉल पाठवू लागला, असा आरोप महिलेने केला होता. केएसईबी आणि पोलिसांकडे तक्रार करूनही तो तिला आक्षेपार्ह मेसेज पाठवत होता, असा दावा तिने केला आहे. तिच्या तक्रारीनंतर आरोपीवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४ए (लैंगिक छळ) आणि ५०९ (महिलेचा अपमान करणे) आणि केरळ पोलिस कायद्याच्या कलम १२० (ओ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एखाद्या व्यक्तीच्या सुंदर शारीरिक शरीरावर टिप्पणी करणे हे आयपीसीच्या कलम ३५४ ए आणि ५०९ आणि केरळ पोलिस कायद्याच्या कलम १२० (ओ) अंतर्गत लैंगिक टिप्पणी मानले जाऊ शकत नाही, असा दावा आरोपींनी केला होता. तथापि, तो न्यायालयाने अमान्य केला.

# अजितदादांसोबत चलण्यासाठी सुनील तटकरेंची ऑफर?

## राष्ट्रवादीत पुन्हा फूट पडण्याचे संकेत



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

राजकारण

**मुंबई :** बाप-लेकींची साथ सोडून अजितदादांसोबत चला, अशी ऑफर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंनी शरद पवार गटाच्या खासदारांना दिल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे राष्ट्रवादीत पुन्हा फूट पडणार का? असा सवाल राजकीय वर्तुळात उपस्थित करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डिसेंबर महिन्यात दिल्लीत संसदेचं हिवाळी अधिवेशन सुरु असताना बाप-लेकींना सोडून सर्वांनी अजित पवारांसोबत चला, असा प्रस्ताव सुनील तटकरे यांनी शरद पवारांच्या खासदारांना दिला. त्यांनी प्रत्यक्ष भेटून खासदारांना हा प्रस्ताव दिला. परंतू, शरद पवार गटाकडून हा प्रस्ताव फेटाळण्यात आलाय. शिवाय तटकरेंच्या या प्रस्तावानंतर सुप्रिया सुळे त्यांच्यावर चांगल्याच संतापल्या आणि त्यांनी लगेच प्रफुल पटेलांना फोन केला. असा विचार तुमच्या मनात येतोच कसा, असा सवाल सुळेंनी प्रफुल पटेलांना केल्याचीही माहिती पुढे आली आहे.

मात्र, सुनील तटकरे यांनी याबाबतच्या सर्व चर्चा फेटाळल्या आहेत. एका वृत्तवाहिनीशी बोलताना ते म्हणाले की, "माझ्या ७० वर्षांच्या आयुष्यात आणि ४० वर्षांच्या राजकीय जीवनात मी कधीही बाप-लेक असा शब्दप्रयोग केला नाही. पण काही मंडळींना असा शब्दप्रयोग करण्याची सवय पडली असते. त्यामुळे ते वारंवार त्याचा उपयोग करण्याचा प्रयत्न करतात. तो त्यांच्या सवयीचा आणि विकृतीचा भाग असू शकेल. विधानसभा निवडणूकीतील दारूण अपयशानंतर महाराष्ट्रातील जनतेने ज्यांना त्यांची जागा दाखवली असे लोक आपल्या पक्षाची विश्वासार्हता आणि कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण झालेले नैराश्य सावरण्यासाठी काही आरोप करण्याचा प्रयत्न करतात. मी लोकसभा सदस्य असल्याने दिल्लीला नेहमी जात असतो. अधिवेशनात देशातील, राज्यातील लोकसभा सदस्य भेटत असतात. माझी कुणाशी इतर काहीही चर्चा झालेली नाही. मात्र, कुणी कुणाजवळ केव्हा काय चर्चा केली याबाबतची माहिती मी योग्य वेळी देईल," असे ते म्हणाले.

# महाकुंभसाठी प्रयागराज विमानतळ सज्ज

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** प्रयागराज विमानतळाचा बुधवारी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आढावा घेतला. उत्तर प्रदेश येथे भव्य महाकुंभ २०२५ होणार आहे. महाकुंभला भेट देणाऱ्या भाविकांना आणि प्रवाशांना पुरविल्या जाणाऱ्या सुविधा आणि सेवांची नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या (DGCA) अधिका-यांसोबत तपासणी आणि आढावा घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयागराज विमानतळ आता नवीन ओळख घेऊन उदयास येत आहे. प्रयागराज विमानतळ आता महाकुंभ २०२५ साठी पूर्णपणे सज्ज आहे. विमानतळाच्या विद्यमान टर्मिनलचे १४ कोटी रुपये खर्चून आधुनिकीकरण करण्यात आले आहे. आता या विमानतळावरील प्रवाशांची संख्या ताशी ३५० वरून १०८० झाली आहे. याशिवाय विमानतळाचे क्षेत्रफळ ६७०० चौरस मीटरवरून ८५०० चौरस मीटरपर्यंत वाढले आहे. त्यामुळे प्रवाशांना चांगली सेवा मिळत असून प्रवाशांच्या संख्येतही लक्षणीय वाढ झाली आहे. चेक-इन काउंटरची संख्याही ११ वरून १८ करण्यात आली आहे. XSIB मशीन देखील अपग्रेड केल्या गेल्या आहेत. महाकुंभ २०२५ साठी येणाऱ्या भाविकांच्या सुविधांसाठी विमानतळाचे नवीन टर्मिनलही पूर्णतः सुसज्ज आहे. या नवीन टर्मिनलमध्ये गर्दीच्या वेळेतही १६२० प्रवाशांना सेवा देण्याची क्षमता आहे. विमानतळाचे हे टर्मिनल १७००० चौरस मीटरमध्ये पसरलेले असून त्याच्या बांधकामासाठी एकूण २१७ कोटी रुपये खर्च आला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाने परिपूर्ण सुविधा, आरामदायी वेटिंग रूम आणि वेगवान चेक-इन प्रक्रियांमुळे हे विमानतळ आता प्रवाशांसाठी पूर्वीपेक्षा अधिक सोयीस्कर बनले आहे. महाकुंभमेळ्यादरम्यान देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांसाठी हे मुख्य प्रवेशद्वार बनणार आहे.

# महाराष्ट्राची ड्रग्जविरोधात मोठी लढाई

## देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क






**नवी मुंबई :** संपूर्ण महाराष्ट्रात आम्ही ड्रग्जविरुद्ध मोठी लढाई लढणार असून नवी मुंबईपासून सुरु झालेली ही मोहिम इतरही ठिकाणी चालणार आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. बुधवार, ८ जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नवी मुंबई पोलिसांच्या 'नशामुक्त नवी मुंबई' अभियानाचा शुभारंभ झाला. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "नशामुक्त नवी मुंबई ही मोहीम आजपासून सुरु झाली आहे. वेगवेगळ्या प्रकारे जनजागृती करणे, टोल फ्री लाईनच्या माध्यमातून या संदर्भातील माहिती प्राप्त करून त्यावर कारवाई करणे, संदिग्ध असणाऱ्यांवर कारवाई करणे आणि नव्या पीढीला ड्रग्सपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न या मोहिमेद्वारे करण्यात येणार आहे. नवी मुंबईपासून ही मोहीम सुरु झाली असून पुढे इतरही ठिकाणी चालणार आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वात ड्रग्जच्या विरुद्ध एक मोठी लढाई सुरु झाली असून महाराष्ट्रातसुद्धा आपण ती लढाई लढत आहोत."

"आपण मोठ्या प्रमाणात तस्करांवर कारवाई केल्यानंतर आता वेगवेगळ्या प्रकारचे ड्रग्जचे अड्डे तयार करणे सुरु असल्याचे लक्षात आले आहे. सोशल मीडियावर ऑर्डर देऊ कुरियरच्या माध्यमातून ते पोहोचवले जातात. त्यामुळे याविरोधातही आपण मोहीम सुरु केली आहे," असे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, "वेगवेगळ्या पद्धतीने अपराधी ड्रग्ज आणण्याचा प्रयत्न करतात. पण पोलिस त्यांच्या सगळ्या नवीन पद्धती शोधून त्यांच्यावर कारवाई करत आहेत. मुंबई आणि नवी मुंबई या दोन्ही आयुक्तालयांनी गेल्या वर्षभरात ड्रग्जच्या विरुद्ध विक्रमी कामगिरी केली. पंजाबसारखाच महाराष्ट्राच्या आणि देशाच्या वेगवेगळ्या शहरांमध्ये ड्रग्जचा प्रादुर्भाव वाढवण्याचा प्रयत्न सुरु आहे. याविरोधात आज आपण प्रभावीपणे कारवाई केल्यास हे थांबवू शकतो. ही कारवाई आता सुरु केली आहे," असेही ते म्हणाले.

### डॅडीला जामीन मंजूर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** डॅडी या नावाने ओळखला जाणारा मुंबईतला डॉन अरुण गवळी नागपूरच्या कारागृहात आहे. नियमानुसार अरुण गवळीला २८ दिवसांचा जामीन मंजूर झाल्यामुळे तो संचित रजेवर तुरुंगाबाहेर येणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अरुण गवळीला २८ दिवसांचा जामीन मंजूर केली आहे. न्यायमूर्ती नितीन सांबरे आणि वृषाली जोशी यांनी हा निर्णय दिला आहे.

अरुण गवळीने १८ ऑगस्ट २०२४ रोजी नागपूरच्या कारागृह महानिरीक्षक यांच्याकडे संचित रजेसाठी अर्ज केला होता. पण अरुण गवळीचा गुन्हेगारी विश्वातील प्रभाव आणि लवकरच होणार असलेल्या निवडणुका यामुळे पोलिसांनी कायदा - सुव्यवस्थेचे कारण पुढे करत त्याला मंजुरी दिली नव्हती. अखेर प्रकरण उच्च न्यायालयात गेले.

## ट्रम्प पर्वाची चाहुल

पंढरी संचार छायाचित्र सेवा




वॉशिंग्टन डीसी : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा कार्यकाळ लवकरच सुरू होणार असून, ट्रम्प समर्थकांनी त्याची तयारी चालवली आहे. वॉशिंग्टन डीसी येथे म्हणूनच त्यांचे समर्थक जय्यत तयारीला लागले आहेत.

# संभलच्या सुनावणीला स्थगिती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**लखनऊ :** अलाहाबाद उच्च न्यायालयाने संभलच्या जामा मशिदीवर कनिष्ठ न्यायालयामध्ये दाखल केलेल्या खटल्याच्या सुनावणीला स्थगिती दिली आहे. उच्च न्यायालयाने बुधवारी हा आदेश जारी करण्यात आला आहे. याप्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्याचे सर्वेक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याविरोधात मशिदीच्या समितीने उच्च न्यायालयामध्ये धाव घेतली होती.

सर्वोच्च न्यायालयाने नोव्हेंबर २०२४ मध्ये याप्रकरणी आदेश जारी केले होते की, आलाहाबाद उच्च न्यायालयामध्ये सुनावणी होईपर्यंत इतर न्यायालयाकडे याप्रकरणाची कोणतीही एक सुनावणी घेतली जाणार नाही. आता उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाला फेब्रुवारी २०२५ पर्यंत या प्रकरणाच्या सुनावणीस स्थगिती देण्याचे काम केले आहे. उत्तर प्रदेश सरकार, केंद्र सरकार आणि एएसआसह संभल प्रशासनाकडून याबाबत माहिती मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने चंदौसी येथील शाही मशिदीप्रकरणात खटल्यातील संभल जिल्हा न्यायालयाच्या कारवाईला २५ फेब्रुवारी रोजी स्थगिती दिली आहे. न्यायमूर्ती रोहित रंजन अग्रवाल यांच्या खंडपीठाणे चंदौसी संभल येथील शाही जामा मशीद समितीने दाखल केलेल्या दिवाणी पुनरिक्षण याचिकेवर हा आदेश दिला आहे. ज्यात १९ नोव्हेंबर रोजी एका वकील आयुक्तांना मशिदीचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिलेल्या न्यायालयाच्या आदेशाला आव्हान दिले होते. मंदिर पाडून मशीद बांधण्यात आली होती.

याप्रकरणाची पुढील सुनावणी ही २५ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे. दरम्यान न्यायालयाच्या कार्यवाहीस सर्वोच्च न्यायालयाने गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यामध्ये स्थगिती देण्याचे काम सुरू होते, ज्यात असे निर्देश देण्यात आले की, जोपर्यंत मशीद समितीने सर्वेक्षणाच्या आदेशाविरोधात याचिका दाखल केली होती. ती याचिता सुचीबद्ध होणार नाही तोवर न्यायालय पुढील खटला चालवणार नाही.

# दिल्ली निवडणूक : इंडिया आघाडीत फूट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** विशेष प्रतिनिधी दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यापासून राजधानीत दररोज राजकीय नाट्य घडत आहे. निवडणुकीपूर्वी समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव आणि ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षाने आम आदमी पक्षाला (आप) पाठिंबा जाहीर केला आहे.

काँग्रेसप्रणित इंडी आघाडीमध्ये दिल्ली विधानसभा निवडणुकीपूर्वी आणखी एक फूट पडली आहे. यापूर्वी काँग्रेस आणि सत्ताधारी आपने स्वतंत्र निवडणूक लढविण्याची घोषणा केला होती. त्यानंतर काँग्रेस आणि आपमध्ये दररोज राजकीय आरोप - प्रत्यारोप सुरू आहेत. त्यानंतर आता इंडी आघाडीतील आणखी दोन घटकपक्षांनीही दिल्ली विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसऐवजी आपला पाठिंबा देण्याची घोषणा केली आहे.

सपा प्रमुख अखिलेश यादव यांनी काही दिवसांपूर्वी सांगितले होते की, जो पक्ष भाजपचा पराभव करेल; त्याला सपा पाठिंबा देईल. काँग्रेसकडे दिल्लीत मजबूत संघटन नाही, अशा परिस्थितीत आमचा पक्ष आपला पाठिंबा देईल. आपण स्वत: आपचा प्रचार करणार आहोत. दिल्लीत भाजपचा पराभव फक्त आप करू शकत असल्याने आपला पक्ष आपसोबत असल्याचे यादव यांनी म्हटले आहे.

# डिजिटल अरेस्टचे वाढते प्रमाण हे चिंताजनकच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई:** सध्याच्या डिजिटल युगाच्या जमान्यात सर्व बाबी ऑनलाईन करण्याकडे अनेकांचा कल असतो. याचाच लाभ घेऊन ऑनलाईन फ्रॉड करणाऱ्यांच्या संख्येत सातत्याने मोठी वाढ होत असल्याचं पाहायला मिळत आहे. आता त्यामध्ये डिजिटल अरेस्ट या नवीन प्रकाराची भर पडली आहे. एखाद्या अनोळखी क्रमांकावरून व्हॉट्सअॅप किंवा व्हिडीओ कॉल करून समोरच्याला त्याच्याकडून न घडलेल्या गुन्ह्याची माहिती द्यायची आणि त्याच्यावर कारवाई म्हणून थेट डिजिटल अटक करायची, असे प्रकार वाढीस लागलेत. गेल्या काही दिवसांपासून या प्रकारात मोठी वाढ झालीय. या सगळ्यापासून बचावासाठी उपाययोजना काय आहेत त्यासंदर्भात जाणून घेऊ यात.

तुमचं पार्सल आलंय, त्यामध्ये अंमली पदार्थ आहेत, तुम्ही शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केलेल्या कंपनीचा शेअर घोटाळ्यामध्ये सहभाग आहे, त्या कंपनीने आर्थिक गैरव्यवहार केलाय, त्यामुळे तुमच्यावर कारवाई केली जाणार आहे, त्यापासून बचावासाठी पैसे पाठवा किंवा तोपर्यंत काही काळ तुम्हाला डिजिटल अरेस्ट करण्यात येत आहे, असे सांगणारे कॉल येतात आणि त्यामध्ये नागरिकांना बेमालूमपणे मूर्ख बनवले जाते. त्यांची फसवणूक करून त्यांच्याकडून पैसे उकळले जातात. लहान मुलांशी संबंधित अश्लील चित्रफीत पाहिल्याने त्याची नोंद आमच्या संगणकात झालीय, त्यामुळे तुमच्याविरोधात कठोर कारवाई करण्यात येत आहे, अशा प्रकारे नागरिकांना भामट्यांकडून फसवण्यात येतंय. या सर्वांपासून बचावासाठी तुमच्यावर लक्ष ठेवण्यात येत आहे. तुम्ही व्हिडीओ कॉल बंद करू नका, असे आदेश देण्यात येतात. काही प्रकरणात तर महिलांना अटक करताना त्यांची तपासणी करण्यासाठी कपडे उतरवण्यास भाग पाडले जाते आणि त्यानंतर त्याच व्हिडीओचा वापर करून ब्लॅकमेल केले जाते.

- २०२४ मध्ये सुमारे १२०० कोटी रुपयांची फसवणूक
- १५५ कोटी रुपये वाचवण्यात यश
- ६३ कोटी रुपये तक्रारदाराला परत

कोणतीही कागदपत्रे न देत अवघ्या दोन मिनिटांत, पाच मिनिटांत कर्ज देणाऱ्या विविध अॅप्सचा सध्या सुळसुळाट झालाय. अॅप इन्स्टॉल करताना त्यामध्ये मागितलेल्या सर्व बाबींना परवानगी दिली जाते. कर्ज दिले जाते, मात्र एकही हफ्ता थकला तर मात्र तुमच्या मोबाईलमध्ये असलेल्या सर्व क्रमांकावर तुमच्याबद्दल अतिशय घाण भाषेत माहिती पाठवली जाते. हे सर्व प्रकार टाळण्यासाठी अशा फसव्या जाहिराती करणाऱ्या अॅपपासून लांब राहण्याची गरज आहे. काही सोशल मीडियावर तर मैत्री करण्याचे आमिष दाखवून शारीरिक आणि आर्थिक पिळवणूक केल्याचे प्रकार घडतात, त्यामुळे या सर्व अॅपचा वापर करण्यापूर्वी काळजी घेणे आणि खबरदारी बाळगणे अतिशय आवश्यक आहे.

**कोण आहेत लक्ष्य**

- **डिजिटल अरेस्टच्या प्रकरणांमध्ये अनेकदा ज्येष्ठ नागरिक, सेवानिवृत्त कर्मचारी, महिला विशेषतः गृहिणी असा वर्ग लक्ष्य असल्याचे समोर आलंय. सुशिक्षित, नोकरदार, उच्चभ्रू, युवा पिढी यांचीदेखील या प्रकरणात फसवणूक झाल्याचे प्रकार उघडकीस आलेत. वर्क फ्रॉम होम, सेकंड इन्कमसाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्ती यांना जाळ्यात ओढून त्यांची फसवणूक केली जाते.**



"रोहित शर्मा, विराट कोहली, जसप्रीत बुमरा, मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर, निवड समिती सदस्य अजित आगरकर यांच्याकडे क्रिकेटसाठीची उत्तम बुद्धिमत्ता आहे. आगामी काळात त्यांच्याकडून अव्वल दर्जाचे निर्णय घेण्यात येतील. हेच सर्व भारतीय क्रिकेटचे भविष्य ठरवतील. — युवराज सिंग

"बुमराह एक उत्तम गोलंदाज आहे. आम्ही मालिकेत चांगली कामगिरी केली. मैदानावर काहीही झाले तरी मी सर्वोत्तम कामगिरी करण्याचा प्रयत्न करतो. मला वाटते की माझ्या आगमनामुळे इतर संघात थोडी अस्वस्थता होती. — सॅम कॉन्स्टास



# एमबीबी अ‍ॅकॅडमी, योगेश क्रिकेट संघ उपांत्य फेरीत

## १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब २५-२५ क्रिकेट स्पर्धा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ट्वेन्टीफोर स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'कोद्रे फार्म्स करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब २५-२५ क्रिकेट स्पर्धेत एमबीबी अ‍ॅकॅडमीने सुपरओव्हरमध्ये रोमहर्षक विजय मिळवत उपांत्य फेरी गाठली. योगेश क्रिकेट अ‍ॅकॅडमीने एसएआरके संघावर सहज विजय मिळवून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

सिंहगड रोड येथील कोद्रे फार्म्स क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत उत्कंठावर्धक झालेल्या सामन्यामध्ये पहिल्यांदा फलंदाजी करताना व्हिडीआर क्रिकेट अ‍ॅकॅडमीने १११ धावा धावफलकावर लावल्या. अन्शुमन शेखावत याने ४१ धावांची खेळी केली आणि व्हिडीआर संघाच्या धावसंख्येमध्ये





महत्वाचा वाटा उचलला. या लक्ष्याचा पाठलाग करताना एमबीबी अ‍ॅकॅडमीचे फलंदाज ठराविक अंतराने बाद होत होते. निहाद फाटक (३३ धावा), वेदांत कुदळे (२३ धावा) आणि स्वयम पाटील (२१ धावा) यांनी छोट्या खेळी करताना संघाला विजयाच्या समीप नेले होते. शेवटच्या दोन षटकांमध्ये एमबीबी संघाला (१०१/५) विजयासाठी ११ धावांची आवश्यकता होती. व्हिडीआरच्या प्रज्वल याने हे षटक टाकताना ६ धावा दिल्या.

अखेरच्या षटकामध्ये एमबीबीला विजयासाठी ५ धावांची गरज होती. व्हिडीआरच्या संस्कार बांडगर याने हे षटक टाकले आणि पहिल्या चार चेंडूत ३ धावा घेतल्या. त्यानंतर वाईडची एक अवांतर धाव एमबीबी संघाला मिळाली. विजयासाठी एमबीबी संघाला दोन चेंडूत एक धावा असे समीकरण होते. पाचव्या चेंडूवर स्वयम पाटील आणि सहाव्या चेंडूवर श्लोक अंबोरे हे दोन फलंदाज धावबाद झाले आणि एमबीबी संघाचा डाव १११ धावांवर मर्यादित राहीला. सामन्यामध्ये टाय झाल्याने सुपरओव्हरचा अवलंब करण्यात आला. सुपरओव्हरमध्ये एमबीबी अ‍ॅकॅडमीने १५ धावा केल्या तर, व्हिडीआर क्रिकेट अ‍ॅकॅडमीला केवळ ९ धावाच करता आल्या.

अर्णव घाटे याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर योगेश अ‍ॅकॅडमीने एसएआरके अ‍ॅकॅडमीचा ५ गडी राखून सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या एसएआरकेचा संघ ९५ धावांवर गडगडला. अर्णव घाटे याने ११ धावांमध्ये ४ गडी बाद करून अचूक गोलंदाजी केली.

## इंग्लंड अफगाणिस्तानविरुद्ध क्रिकेट सामना खेळणार नाही?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पाकिस्तान आणि युएईमध्ये १९ फेब्रुवारीपासून चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा सुरू आहे. त्यामुळे या स्पर्धेसाठी आता साधारण एक महिनाच राहिला आहे. अशाच सर्व संघ त्यादृष्टीनेही तयारी करत आहे. पण याचदरम्यान, एक मोठा तणाव निर्माण झाला होता, तो असा की इंग्लंड या स्पर्धेत अफगाणिस्तान विरुद्ध खेळणार की नाही, हे निश्चित होत नव्हते. मात्र, आता यावर तोडगा निघाला आहे.

मिडिया रिपोर्ट्सनुसार इंग्लंडमधील जवळपास १६० राजकारणी नेत्यांनी इंग्लंड अँड वेल्स क्रिकेट बोर्डाकडे (ECB) एक विनंती अर्ज पाठवला आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की इंग्लंडने चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार घालावा.

विनंती अर्ज करणाऱ्या राजकारण्यांमध्ये निगेल फॅरेज, जेरेमी कब्रायन आणि लॉर्ड किनॉक अशा नावाजलेल्या नेत्यांचाही समावेश आहे. अफगाणिस्तानमध्ये तालिबान्यांची सत्ता असून त्यांच्याकडून महिलांवर जो अत्याचार होत आहे आणि त्यांना खेळांमध्ये सहभागी होण्यास असलेली बंदी या निषेधार्थ राजकारण्यांनी ECB कडे ही विनंती केली होती.

साल २०२१ मध्ये तालिबान सत्तेत आल्यापासून त्यांनी महिलांना खेळापासून दूर ठेवले आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमधून यासाठी जोरदार विरोध झाला. इंग्लंड याच कारणाने अफगाणिस्तानविरुद्ध द्विपक्षीय मालिकाही खेळत नाही. पण आता इंग्लंडने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये २६ फेब्रुवारीला लाहोरला अफगाणिस्तानविरुद्ध होणाऱ्या सामन्यात खेळू नये असाही आवाज इंग्लंडमध्ये उठवण्यात आला होता.

मात्र, आता ECB ने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये अफगाणिस्तानच्या सामन्यावर बहिष्कार न टाकण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत ECB चे प्रमुख रिचर्ज गौल्ड यांनी सांगितले की द्विपक्षीय मालिकांबाबत पॉलिसी कायम राहिल. मात्र चॅम्पियन्स ट्रॉफी ही आयसीसीची स्पर्धा असल्याने त्यात अफगाणिस्तानविरुद्ध इंग्लंड खेळेल. गौल्ड यांनी पत्रात लिहिले आहे की 'ECB अफगाणिस्तानच्या राजवटीत महिला आणि मुलींना दिल्या जाणाऱ्या वागणूकीचा तीव्र विरोध करत आहे.

## महिला प्रीमियर लीग लखनौ आणि बडोदा येथे होणार



**नवी दिल्ली :** बीसीसीआयने महिला प्रीमियर लीग च्या तिसऱ्या हंगामासाठी २ ठिकाणे निश्चित केली आहेत. सर्व सामने बडोदा आणि लखनौमध्ये ५ संघांमध्ये खेळवले जातील. ही स्पर्धा ६ किंवा ७ फेब्रुवारीपासून सुरू होऊ शकते. दुस-या टप्प्याचे सामने बडोद्यात होणार असून त्यात पात्रता आणि अंतिम फेरीचाही समावेश आहे. स्पर्धेचे अधिकृत वेळापत्रक अद्याप जाहीर झालेले नाही. तथापि, बोर्डाने उत्तर प्रदेश क्रिकेट असोसिएशन आणि बडोदा क्रिकेट असोसिएशन यांना त्यांच्या मैदानावर सामना आयोजित करण्यास सांगितले आहे. वेळापत्रकाची अधिकृत घोषणा काही दिवसांत केली जाईल. महिलांचा आंतरराष्ट्रीय सामना बडोद्यात पार पडला बडोद्यात कोटंबी स्टेडियम आहे, ज्याचे उद्घाटन गेल्या महिन्यातच झाले. येथे भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात सामना रंगला. येथे ३ एकदिवसीय सामने झाले. या स्टेडियममध्ये वरिष्ठ महिला टी-२० स्पर्धा आणि रणजी ट्रॉफीचे सामनेही झाले आहेत.

## शमी चॅम्पियन्स ट्रॉफीमधून पुनरागमन करू शकतो

**नवी दिल्ली :** वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी चॅम्पियन्स ट्रॉफीमधून भारतीय संघात पुनरागमन करू शकतो. त्याने मंगळवारी एका व्हिडिओ



पोस्टद्वारे त्याच्या फिटनेसचे अपडेट दिले. २७ सेकंदाच्या व्हिडिओमध्ये शमी पूर्ण ताकदीने गोलंदाजी करताना दिसत आहे. या ३४ वर्षीय गोलंदाजाने आपल्या पोस्टमध्ये लिहिले - 'अचूकता, वेग आणि उत्कटता... जगाचा सामना करण्यासाठी सर्व काही तयार!' शमी वनडे वर्ल्ड कप २०२३ पासून टीम इंडियाच्या बाहेर आहे. रणजी ट्रॉफी, सय्यद मुश्ताक अली आणि विजय हजारे ट्रॉफीमधील कामगिरीने त्याने पुनरागमन केले असले तरी तो पूर्णपणे तंदुरुस्त नसल्यामुळे बॉर्डर-गावस्कर करंडक साठी भारतीय संघात निवडला गेला नाही. १. देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी रणजी ट्रॉफीच्या पहिल्या फेरीत मध्य प्रदेश विरुद्ध बंगालच्या सामन्यातून शमी दुखापतीनंतर परतला. सय्यद मुश्ताक अली (टी-२०) आणि विजय हजारे ट्रॉफी (ओडीआय) मध्ये त्याने प्रभावी कामगिरी केली होती, ज्यामुळे त्याच्या भारतीय संघात पुनरागमनाच्या आशा वाढल्या आहेत.

## न्यूझिलंडने दुसरा सामना ११३ धावांनी जिंकला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**हॅमिल्टन :** न्यूझीलंडने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात श्रीलंकेचा ११३ धावांनी पराभव केला. हॅमिल्टनच्या सेडन पार्क स्टेडियमवर बुधवारी न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना २५५ धावा केल्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेला केवळ १४२ धावा करता आल्या. या निकालासह न्यूझीलंडने ३ वनडे मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे.

पावसामुळे सामना ३७-३७ षटकांचा करण्यात आला. श्रीलंकेकडून फिरकीपटू महीष तीक्षणाने हॅट्ट्रिक घेतली, तरीही संघाला विजय मिळवता आला नाही. न्यूझीलंडकडून अर्धशतक झळकावणारा रचिन रवींद्र सामनावीर ठरला. तिसरा वनडे ११ जानेवारी रोजी ऑकलंडमध्ये खेळवला जाईल.

न्यूझीलंडने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी केली. विल यंग केवळ १६ धावा करून बाद झाला. त्याच्यानंतर रचिन रवींद्र आणि मार्क



चॅपमन यांनी शतकी भागीदारी करत संघाची धावसंख्या १५० च्या जवळ नेली. रचिन ७९ धावा करून बाद झाला तर चॅपमन ६२ धावा करून बाद झाला. यष्टिरक्षक टॉम लॅथम केवळ १ धाव करून पॅव्हेलियनमध्ये परतला.

त्यानंतर डॅरिल मिशेलने ग्लेन फिलिप्स आणि कर्णधार मिचेल सँटनर यांच्यासोबत जबाबदारी स्वीकारली. फिलिप्स २२ धावा करून आणि सँटनर २० धावा करून बाद झाला. मिचेलने केवळ ३८ धावा केल्या, पण संघाची धावसंख्या २५० च्या पुढे नेली. संघाने ३७ षटकांत ९ गडी गमावून २५५ धावा केल्या.

## चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा 'दुबई'त खेळवली जाणार!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेला आता अवघी ४०-४४ दिवस शिल्लक राहिली आहेत. भारत-पाकिस्तान यांच्यातला तिढा सुटता सुटत नसल्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर होण्यास विलंब झाला. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने हायब्रिड मॉडेल मान्य केले आणि त्यानुसार भारतीय संघाचे सामने दुबईत खेळवणार असल्याचे ठरले. पाकिस्तानमध्ये १० सामने होतील, परंतु आता त्यांच्या होण्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झालाय, अशी परिस्थिती उद्भवली आहे.

पाकिस्तानातील रावळपिंडी, लाहोर व कराची येथे चॅम्पियन्स ट्रॉफीचे सामने खेळवले जाणार आहेत. पण, कराचीच्या नॅशनल स्टेडियम, लाहोरचा गद्दाफी स्टेडियम आणि रावळपिंडी क्रिकेट स्टेडियमची सध्याची परिस्थिती पाहता, तिथे सामने होतील की नाही ही शंका आहे.

## पीव्हीपीआयटी रोबोटिक्स टीम प्रिक्सचा रशियात डंका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पद्मभूषण वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी च्या रोबोटिक्स क्लबच्या 'टीम प्रिक्स' या संघाने आंतरराष्ट्रीय स्तरावर रशियातील यार्सलोव्हा नोव्हगोरोड विद्यापीठात आयोजित प्रतिष्ठित 'विंटर युनिव्हर्सिटी स्टार्टअप फेस्ट' मध्ये चौथा क्रमांक पटकावला आहे.

ही आंतरराष्ट्रीय स्टार्टअप स्पर्धा रशियातील नोव्हगोरोड शहरात डिसेंबरच्या शेवटी पार पडली. जगभरातील एकुण २८ देशातील १०० पेक्षा अधिक संघांनी या स्पर्धेत भाग घेतला होता, त्यामुळे या यशाचे महत्त्व अधिकच वाढते. 'टीम प्रिक्स'च्या प्रीती सूर्यवंशी आणि श्रेया बोगा या विद्यार्थिनींनी न्यूरल नेटवर्किंग सिस्टीमवर आधारित एक अभिनव प्रकल्प सादर केला. न्यूरल नेटवर्क मानवी मेंदूच्या कार्यपद्धतीचे अनुकरण करून संगणकाला जटिल समस्या



सोडवण्यास शिकवतात. हा प्रकल्प कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगच्या क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरू शकतो. या दोघींनी या स्पर्धेतील इतर ६२ प्रकल्पांमध्येही सक्रिय सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांच्या संपूर्ण तयारीसाठी मेंटर म्हणून महाविद्यालचे अल्युमिनी माजी विद्यार्थी सुशांत बर्डे, रोहन खोपडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष प्रा डॉ तानाजीराव सावंत, सचिव मा गीरीराज सावंत, संकुल संचालक डॉ वंसत बुगडे ,पीव्हीपी आयटीचे प्राचार्य डॉ. आर. एस. पवार यांनी 'टीम प्रिक्स'च्या सदस्यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशानिमित्त आयोजित सत्कार समारंभात रोबोटिक्स क्लबचे समन्वयक प्राध्यापक अमित मस्के, प्राध्यापक निलेश पवार, प्रा गायत्री चव्हाण, डॉ आर डी कांबळे, सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

## स्पोर्ट्स मॅनियाचा दुसरा विजय

**पुणे :** स्पोर्ट्स मॅनियाने उत्कृष्ट फॉर्म कायम राखताना एआयएफएफ एलिट युथ लीगमधील 'अवे' सामन्यात राजस्थान एफसीवर १-० अशी मात केली. त्यांचा हा सलग दुसरा विजय आहे. राजस्थान येथील एलआयईटी अलवर, मैदानावर मंगळवारी झालेल्या सामन्यातील एकमेव आणि निर्णायक गोल पृथ्वीराज पाटीलने (५६वा) उत्तरार्धात केला. स्पोर्ट्स मॅनियाने दोन्ही सत्रात सर्व आघाड्यांवर सर्वोत्तम खेळ केला. दुसऱ्या हाफमध्येच स्पोर्ट्स मॅनियाने आघाडी घेतली तरी मजबूत बचाव कायम ठेवता ना आघाडी कायम राखली.मॅचविनर गोल काउंटर आक्रमणातून झाला. वेदांत जैस्वालच्या पासवर लेफ्ट बॅक ध्रुव सावंतने पृथ्वीराजला गोल करण्यात मोलाची मदत केली. पृथ्वीराजने वरच्या कॉर्नरवरून चेंडूला अचूक गोळजाळ्यात टाकला. पृथ्वीराजचा हा दुसऱ्या सामन्यांतील हा दुसरा गोल आहे. स्पोर्ट्स मॅनिया, पुण्यातील एकमेव २-स्टार एआयएफएफ मान्यताप्राप्त अकादमीने आश्वासक सुरुवात केली. 'होम' सामन्यात त्यांनी महाराष्ट्र ओरांजे एफसीवर (२-१) असा विजय मिळवला. विजयी सलामीनंतर स्पोर्ट्स मॅनियाचा हा सलग विजय दुसरा विजय आहे. स्पोर्ट्स मॅनियाचे आता दोन सामन्यांतून ६ गुण झाले आहेत. दुसरीकडे, राजस्थान एफसीला सलग दुसरा पराभव पत्करावा लागला.

## बारामती पॉवर मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामतीची प्रसन्न गुलाबी थंडीने सजलेली पहाट, हिरवाई नटलेले सुंदर रस्ते , एसआरपीएफ च्या शिस्तबद्ध बँड पथकाने रनर्सचे फिनिश पॉईंटवर केलेले अविस्मरणीय स्वागत आणि बारामतीचा विकास पॅटर्न न्याहाळत रनर्सने विक्रमी वेळेत साधलेली दौड यांमुळे पुनीत बालन ग्रुप प्रस्तुत बारामती पॉवर मॅरेथॉनचा दुसरा सिझन संस्मरणीय ठरला.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुनेत्रा पवार, युवा उद्योजक आणि पुनीत बालन ग्रुपचे अध्यक्ष व युवा उद्योजक पुनीत बालन, जान्हवी पुनीत बालन-धारिवाल, युवा नेते पार्थ पवार,



अभिनेता जॅकी भगनानी यांनी पहाटे चार वाजता झेंडा दाखवून या मेरोथॉन स्पर्धेचा शुभारंभ केला. वर्ल्ड ऍथलेटिक असोसिएशनची मान्यतेने आणि तालुका स्तरावर आंतरराष्ट्रीय मानकांच्या दृष्टीने संपन्न होणारी बारामती पॉवर मॅरेथॉन ही कॉम्प्रेड मॅरेथॉन सारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या मॅरॅथॉनसाठी पात्रता निकष गणली जाते. त्यामुळे देशभरातून अनेक ख्यातनाम रनर्स या मॅरेथॉन मध्ये सहभागी होत असतात. सलग दुसऱ्या वर्षी पुनीत बालन ग्रुपच्या सहकार्याने या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

> "बारामतीची प्रगती चहुबाजूंनी होत असताना, त्याला क्रीडा क्षेत्र देखील अपवाद नाही. आरोग्यपूर्ण जीवनशैलीसाठी मॅरेथॉन सारख्या स्पर्धा महत्वाच्या ठरतात आणि या प्रकारच्या स्पर्धांच्या आयोजनात पुनीत बालन आणि त्यांच्या सौभाग्यवती जान्हवी या नेहमीच आघाडीवर असतात. त्यांच्या सहकार्यामुळे ही स्पर्धा यशस्वी रित्या सलग दुसऱ्या वर्षी ही स्पर्धा होत आहे. सतिश ननवरे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने मेहनत घेऊन ही मॅरेथॉन यशस्वी केली त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.
> - **अजित पवार,** उपमुख्यमंत्री

## ईश्वरीला भालाफेक मध्ये कास्य पदक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ईश्वरी चंद्रकांत धंगेकर हिने झारखंड रांची येथे नुकत्याच झालेल्या ६८ व्यां नॅशनल स्कूल अजिंक्यपदक १९ वर्ष गटातून भालाफेक मध्ये कास्य पदक (ब्रॉन्झ मेडल) पटकावले.

ईश्वरी धंगेकर सध्या पुणे येथे शाहु कॉलेज मध्ये १२वी शिकत आहे . पुणे येथील उत्कृष्ट पारा ऑलिम्पिक कोच लखविंदर सिंग व अक्षय सरांच्या मार्गदर्शन पर ईश्वरी इलीटी क्लब येथे सराव करत आहे. तिच्या यशासाठी सर्वांनी मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.



## ब्रिलियंट्स स्पोर्टस अकादमी संघाचा अंतिम फेरीत प्रवेश

**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक १३ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत स्वराज मोरे(३-२४) याने



केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर ब्रिलियंट्स स्पोर्टस अकादमी संघाने टीएलबी रत्नागिरी क्रिकेट अकादमी संघाचा ७० धावांनी पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. धायरी येथील सहारा क्रिकेट अकादमी व स्टार क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत प्रथम फलंदाजी करताना ब्रिलियंट्स स्पोर्टस अकादमी संघाने २५ षटकात ४ बाद १५४ धावा केल्या. यात रितम सेन २८, विराट भिसे नाबाद २३, स्वराज मोरे २४ यांनी धावा केल्या. या आव्हानाचा पाठलाग करताना टीएलबी रत्नागिरी क्रिकेट अकादमी संघ २४.१ षटकात सर्व बाद ८४ धावावर संपुष्टात आला. यात नील जाधव २५, शालवा महाजन १०, शौर्य उपाध्याय १० यांनी दिलेली लढत अपुरी ठरली.विजयी संघाकडून स्वराज मोरे(३-२४), अश्वथचंद्रा थोरा(२-१०) यांनी सुरेख गोलंदाजी करत संघाला ७०धावांनी विजय मिळवून दिला.


* सामनावीर - स्वराज मोरे; ब्रिलियंट्स स्पोर्टस अकादमी संघ ७० धावांनी विजयी.

## व्यापाऱ्यांच्या मार्केट यार्ड फ्रेंडस क्रिकेट लीग स्पर्धेला १० जानेवारीपासून प्रारंभ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील व्यापाऱ्यांच्या मार्केट यार्ड फ्रेंडस क्रिकेट लीग स्पर्धेला १० जानेवारीपासून प्रारंभ होत आहे. या स्पर्धेत व्यापारी आणि दलाल यांचे १६ संघ सहभागी होणार आहेत. विजेत्या संघाला एक लाख रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे.

हे स्पर्धेचे चौथे वर्ष असून मार्केट यार्ड भागातील व्यापाऱ्यांना एका व्यासपीठावर आणणे, व्यवसाय वाढीसाठी प्रयत्न करणे या उद्देशाने दरवर्षी या क्रिकेट लीग स्पर्धेचे आयोजन केले जाते. याविषयी आयोजक समितीचे



सदस्य मुकेश गोयल, जतीन शाह, कुणाल ओस्तवाल, सुदर्शन भंडारी, कमलेश गोयल, सचिन रायसोनी यांनी पत्रकारांना माहिती दिली. ही स्पर्धा गंगाधाम चौकाजवळील ए के एस क्रिकेट अकादमीच्या ( नजूश्री प्रतिष्ठान ) मैदानावर दहा ते बारा जानेवारी या कालावधीत पार पडणार आहे. दि पूना मर्चंट चेंबरचे सदस्य असलेले तीनशेहून अधिक व्यापारी आणि दलाल या स्पर्धेत खेळताना दिसतील. स्पर्धेचा उद्घाटन समारंभ १० जानेवारी रोजी सकाळी आठ वाजता महिला क्रिकेटपटू दिशा कासट हिच्या हस्ते आणि अप्पर पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. या स्पर्धेत विजेतेपद मिळविणाऱ्या संघाला एक लाख रुपयांचे रोख पारितोषिक आणि चषक दिला जाणार आहे उपविजेत्या संघासाठी ५१ हजार रुपये आणि चषक दिले जाणार आहे. तसेच मॅन ऑफ द लीग मिळवणाऱ्या खेळाडूस २१ हजार रुपये तर सर्वोत्कृष्ट गोलंदाज फलंदाज आणि क्षेत्ररक्षकास प्रत्येकी ११ हजार रुपये रोख आणि चषक पारितोषिक दिला जाणार आहे.


### अरुण साने मेमोरियल हौशी टेनिस लीग स्पर्धेत

## टेनिसनट्स रॉजर संघाला विजेतेपद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना व पुणे मेट्रोपोलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) तर्फे आयोजित व आयकॉन ग्रुप पुरस्कृत अरुण साने मेमोरियल हौशी टेनिस लीग स्पर्धेत अंतिम फेरीत टेनिसनट्स रॉजर संघाने पीवायसी अ संघाचा १४-१० असा पराभव करून विजेतेपद संपादन केले.

पीवायसी हिंदू जिमखाना टेनिस कोर्ट येथे पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीच्या लढतीत ९० अधिक दुहेरीत टेनिसनट्स



रॉजरच्या संदीप बेलुडी व जॉय बॅनर्जी यांनी पीवायसीच्या योगेश पंतसचिव व प्रशांत गोसावी यांचा ६-० असा एकतर्फी पराभव करून संघाचे खाते उघडले. खुल्या दुहेरीत पीवायसीच्या अमित लाटेने सारंग देवीच्या साथीत रवी कोठारी व अमित किंडो यांचा ६-२ असा पराभव करून ही आघाडी कमी केली. निर्णायक लढतीत टेनिसनट्स रॉजरच्या सलील कुंचूर व नितीन सावंत या जोडीने पीवायसीच्या मिहिर दिवेकर व तन्मय चोभे यांचा ६-४ असा पराभव करून संघाला विजय मिळवून दिला. स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक व २५,००० रुपये, उपविजेत्या संघाला करंडक व १५,००० रुपये अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण पीवायसी हिंदू जिमखानाचे सह सचिव सारंग लागू, आशा साने, नमिता टेपण आणि पराग टेपण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पीवायसी जिमखानाचे अविनाश रानडे, क्लबच्या टेनिस विभागाचे सचिव अभिषेक ताम्हाणे, शिरीष साठे आदी मान्यवर उपस्थित होते.